बुधवार, २८ डिसेंबर २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक १६०
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## शस्त्रसाठा, स्फोटके, ड्रग्जसह पाकिस्तानी बोट पकडली



**ओखा :** भारतीय तटरक्षक दलास एका कारवाईत मोठे यश आले आहे. शस्त्रसाठा, स्फोटके आणि तब्बल ३०० कोटींचे ४० किलो अमली पदार्थ घेऊन जाणारी १० जणांसह असलेली एक पाकिस्तानी बोट मंगळवारी (दि. २७) सकाळी गुजरात किनाऱ्यावर पकडण्यात आली. गुजरात दहशतवादविरोधी पथकास मिळालेल्या माहितीच्या आधारे तटरक्षक दलाने आंतरराष्ट्रीय समुद्री सीमारेषा क्षेत्रात पाळत ठेवण्यासाठी 'आयसीजीएस अरिंजर' हे गस्त जहाज तैनात केले आहे. त्याद्वारे ही कारवाई करण्यात आली. मागील १८ महिन्यांमध्ये गुजरात एटीएस आणि आयसीजीचे हे सातवे संयुक्त अभियान आहे.

अंतरंग
दिव्यांग प्रमाणपत्र वितरणात रायगडची उल्लेखनीय कामगिरी/२
खोपोलीतील नागरी समस्या सोडवा; भाजप आक्रमक/५
मुरूड, अलिबागच्या विद्यार्थ्यांचे कराटे स्पर्धेत यश/८

### सीमा भागातील मराठी भाषिकांच्या पाठिशी महाराष्ट्र खंबीरपणे उभा!

# विधिमंडळात एकमताने ठराव मंजूर

**नागपूर : प्रतिनिधी**

कर्नाटकातील मराठी भाषिक ८६५ गावांची इंच न् इंच जागा महाराष्ट्राचीच असून सीमा भागातील मराठी भाषिकांच्या पाठिशी महाराष्ट्र शासन खंबीरपणे, निर्धाराने व सर्व ताकदीनिशी उभे असल्याचा ठराव मंगळवारी (दि. २७) महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये एकमताने मंजूर करण्यात आला.



सभागृहातील दोन्ही बाजूच्या सदस्यांनी बाके वाजवत एकमताने ठराव संमत केला. या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सीमा लढ्यातील हुतात्म्यांना अभिवादन केले तसेच सर्व सदस्यांचे आभार मानले. त्याचबरोबर सीमा भागातील मराठी बांधवांसाठी महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या निर्णयांची आणि सुरू केलेल्या योजनांविषयी मुख्यमंत्री शिंदे यांनी माहिती दिली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठरावात म्हटले आहे की, सीमा भागातील प्रश्न, लाखो मराठी भाषिकांवर तेथील प्रशासनाकडून वर्षोनुवर्ष होणारा अन्याय, दुय्यम वागणूक, अत्याचार, त्यांच्या जीविताचा प्रश्न गंभीर होणे, इतकेच नव्हे तर सीमा प्रश्न समन्वयक मंत्र्यांनाच कर्नाटकमध्ये प्रवेश करण्यास तेथील प्रशासनाकडून बंदी घालणे, मराठी भाषिकांनी आतापर्यंत शांततेने काढलेल्या अनेक पदयात्रांवर कर्नाटक पोलिसांनी अमानुषपणे लाठीमार करणे, त्यांची आंदोलने चिरडण्याचा प्रयत्न करणे व महाराष्ट्रातील वाहनांवर हल्ले करणे, तेथील मराठी भाषिकांच्या जमिनी स्थानिक विकास प्राधिकरणांकरिता संपादित करून त्याचे भूखंड कन्नड भाषिकांना वितरीत करणे तसेच अल्पसंख्य आयोगाने व उच्च न्यायालयांनी दिलेल्या मराठीसह दोन्ही भाषांमध्ये स्थानिक प्राधिकरणातील दिली जाणारी शासकीय सर्व कागदपत्रे आदेशाची अंमलबजावणी न करता स्थानिक मराठी भाषिकांची संख्या कमी करण्यासाठी प्रयत्न करणे इ. बाबी कर्नाटकातील स्थानिक प्रशासनाकडून जाणीवपूर्वक केला जात आहे.

> *राज्य सरकारचे मी अभिनंदन करतो, त्यांना धन्यवाद देतो की, सीमाभागातील जे अन्यायग्रस्त मराठी भाषिक, माता-भगिनी आणि बांधव आहेत त्यांच्या पाठीशी आपण ठामपणे उभे आहोत असा ठराव त्यांनी आज मंजूर केला. त्याला आमचा पाठिंबा आहे.*
> *-उद्धव ठाकरे, माजी मुख्यमंत्री*

या सर्व बाबींवर केंद्र शासनाने हस्तक्षेप करण्यासाठी १४ डिसेंबर २०२२ रोजी केंद्रीय गृहमंत्री यांनी नवी दिल्ली येथे कर्नाटकचे मुख्यमंत्री आणि मी तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बैठकीत दोन्ही राज्यांमध्ये समन्वय ठेवून सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत वाद न वाढविता दोन्ही राज्यांमध्ये शांतता ठेवण्याकरिता एकमत केले. असे असतानादेखील विपरीत भूमिका कर्नाटक शासनाने घेतलेली आहे. दरम्यान, कर्नाटक विधिमंडळाने एकही इंच जमीन न देण्याच्या २२ डिसेंबर २०२२ रोजी केलेल्या ठरावामुळे सीमावादाला चिथावणी देण्याचे काम कर्नाटक सरकारकडून जाणीवपूर्वक केले जात असून कर्नाटक शासनाची ही भूमिका लोकशाही संकेतास धरून नाही. एकाच देशातील दोन राज्यांमध्ये सौहार्दाचे वातावरण राहावे यासाठी महाराष्ट्राने अत्यंत खंबीरपणे व सर्व शक्तीनिशी याबाबतचा कायदेशीर लढा सनदशीर मार्गाने सुरू ठेवला आहे. आपण कायदेशीर बाजू मांडण्यासाठी नियमित विधीज्ञांच्या टीमव्यतिरिक्त ज्येष्ठ विधिज्ञ हरिष साळवे यांनी विनंती केली आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

### 'पंडित नेहरूंच्या चुकीमुळे मराठी भाषिक जबरदस्तीने कर्नाटकमध्ये'

राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात मंगळवारी महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नावर ठराव मंजूर करण्यात आला. त्यावर राज्यभरातून प्रतिक्रिया उमटत असून भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंचा उल्लेख करीत या प्रश्नासाठी ते जबाबदार असल्याचे सांगितले. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या चुकीमुळे मराठी भाषिक जबरदस्तीने कर्नाटकमध्ये समाविष्ट करण्यात आले. तेव्हा पंतप्रधान म्हणून हा प्रश्न सोडवण्यासाठी मदत करण्याऐवजी त्यांनी दोन मुख्यमंत्र्यांनी एकत्र बसून प्रश्न सोडवावा असे सांगितले. त्यानंतरही प्रश्न सुटला नाही, तर दोन्ही राज्यांच्या चिटणीसांनी प्रश्न सोडवावा, अशी सूचना केली. पंडित नेहरूंची याबाबत प्रचंड अनास्था होती. हा प्रश्न सुटावा असे त्यांना वाटत नसावे, असे मंत्री मुनगंटीवार म्हणाले.

### ...अन् उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एकनाथ खडसेंवर संतापले

महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी विधान परिषदेत ठराव मंजूर करण्यात आल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते एकनाथ खडसे यांनी त्याचा 'मिळमिळीत' असा उल्लेख केला तसेच कर्नाटक महाराष्ट्राविरोधात आक्रमकपणे आव्हानात्मक भाषा करीत आहे, पण महाराष्ट्राच्या ठरावामध्ये फक्त तुम्हाला समज देतो, असे सांगितले आहे, असा सवाल प्रश्न उपस्थित केला. यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस संतापले. एकतर आपण एकमताने ठराव मंजूर करून परत त्याच्यावर चर्चा करतो. चार गोष्टी तिकडून मांडल्या तर आम्ही ५० गोष्टी बोलू शकतो. आमच्याकडे शब्द नाहीत असे नाही. तिथे कर्नाटक एक आहे, तर आपले सभागृह एक होऊ शकत नाही का? काहीतरी गोष्टी आपण पाळल्या पाहिजेत, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी खडसेंना खडसावले.

## आमच्याजवळही भरपूर बॉम्ब, ते कधी काढायचे आम्ही ठरवू!

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे उद्धव ठाकरेंना प्रत्युत्तर

**नागपूर : प्रतिनिधी**

विधिमंडळ अधिवेशनातील मंगळवारचे (दि. २७) कामकाज सुरू होण्याअगोदर भाजपच्या आमदारांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नागपुरातील रेशीमबाग कार्यालयास भेट दिली. यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रसारमाध्यमांच्या विविध प्रश्नांना उत्तरे देताना माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्य सरकारवर केलेल्या टीकेला आणि सूचक इशाऱ्याला प्रत्युत्तर दिले.




उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मला काल सीमाप्रश्नी बोलणाऱ्यांचे आश्चर्य वाटले की, अडीच वर्ष ते मुख्यमंत्री होते, तेव्हा काहीच केले नाही. सीमा प्रश्न आमचे सरकार आल्यावर निर्माण झालेला नाही, तर महाराष्ट्राच्या निर्मितीपासून किंवा भाषावार प्रांतरचना तयार झाल्यापासून आहे. तेव्हापासून वर्षानुवर्षे ज्यांची सरकारे होती ते आता असे भासवत आहेत जणू काही हे सरकार आल्यानेच सीमा प्रश्न तयार झाला. सीमा प्रश्नावर अशा प्रकारचे कधीच राजकारण झाले नाही. आम्ही अनेक वर्षे विरोधात होतो, परंतु सरकारच्या पाठीशी ताकदीने उभे राहिलो, कारण हा मराठी माणसाचा प्रश्न आहे.

याशिवाय उद्धव ठाकरे यांनी काल जोपर्यंत सीमा प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय येत नाही तोपर्यंत सीमाभाग केंद्रशासित घोषित करण्याचा ठराव घेतला जावा, अशी मागणी केली होती. यावर उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले की, मागणी करण्यासाठी कोणी काहीही मागणी करू शकेल, पण इतक्या वर्षांत हे का झाले नाही? याचे उत्तर त्यांना पहिल्यांदा द्यावे लागेल.

याचबरोबर गायरान जमीन प्रकरणावरून कृषीमंत्री अब्दुल सत्तारांच्या राजीनाम्याची विरोधकांनी केलेली मागणी आणि शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सत्ताधाऱ्यांबाबत मोठे बॉम्ब फोडण्याचा दिलेला सूचक इशारा, यानंतर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी त्यावर विधान भवन परिसरात आमच्याकडे बरेच बॉम्ब आहेत. त्यांच्या वाती काढल्या आहेत, फक्त त्या पेटवण्याचा अवकाश असल्याच्या केलेल्या विधानावर उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले.

कुठलेही प्रकरण काढायचे, त्यावर हंगामा करायचा आणि उत्तर घ्यायचे नाही अशा प्रकारचा प्रयत्न दिसतोय. आतापर्यंत तरी हे जे बॉम्ब, बॉम्ब म्हणताय तो लवंगी फटाकेदेखील नाही. आमच्याजवळ भरपूर बॉम्ब आहेत, ते कधी काढायचे आम्ही ठरवू, पण आता सध्या यांचे लवंगी फटाके काय आहेत ते आम्ही बघू, असा टोला उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी लगावला.

### निवडक

#### पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या भावाचा कार अपघात; रुग्णालयात दाखल

**म्हैसूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे बंधू प्रल्हाद मोदी यांच्या कारचा मंगळवारी (दि. २७) दुपारी कर्नाटकमधील म्हैसूर येथे अपघात झाला. त्यांच्यासह पत्नी, मुलगा, सून आणि नातू बंदीपुरा येथे चालले असताना कार दुभाजकाला आदळली. या अपघातात प्रल्हाद मोदी यांच्या नातवाचा पाय फ्रॅक्चर झाला आहे तसेच इतर किरकोळ जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असल्याचे वृत्त आहे.

#### आत्महत्येच्या तीन दिवसांनंतर अभिनेत्री तुनिषावर अंत्यसंस्कार

**मुंबई :** टीव्ही अभिनेत्री तुनिषा शर्माने २४ डिसेंबरला मालिकेच्या सेटवरच गळफास घेत जीवन संपविले. आत्महत्या केल्यानंतर तीन दिवसांनी मंगळवारी (दि. २७) तुनिषच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. तुनिषाला अखेरचा निरोप देण्यासाठी कुटुंबीय व टीव्ही जगतातील कलाकार आवर्जून उपस्थित होते.



## खोपोलीजवळ टँकरला वेल्डिंग करताना स्फोट; दोघे होरपळले



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

रिकाम्या पेट्रोल टँकरला वेल्डिंग करीत असताना स्फोट होऊन दोन जण जखमी झाल्याची घटना मंगळवारी (दि. २७) दुपारी १.३०च्या सुमारास मुंबई-पुणे महामार्गावर खोपोलीजवळील हाळ येथे घडली.

मिळालेल्या माहितीनुसार मुंबई-पुणे महामार्गावर खोपोलीजवळ हाळ गावच्या हद्दीत सागर हॉटेलसमोरील गॅरेजमध्ये एका रिकाम्या पेट्रोल टँकरचे (एमएच ४९ बीएफ ७५७०) वेल्डिंग काम सुरू होते. या वेळी अचानक टँकरचे झाकण उडून दोन जण गंभीर जखमी झाले. यापैकी एकाच्या दोन्ही पायांना गंभीर दुखापती झाल्या, तर दुसऱ्याचे पाय भाजून सोलून निघाले. जखमींना कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. चालक जुबेर शहा (उत्तर प्रदेश) व गॅरेज कर्मचारी मुन्नाभाई अशी त्यांची नावे आहेत. या घटनेबाबत खालापूर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## रूपाली पाटील यांची कानउघाडणी

**पुणे : प्रतिनिधी**

कसबा विधानसभा पोटनिवडणूक लढविण्याची जाहीर इच्छा व्यक्त करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रवक्त्या ॲड. रूपाली पाटील-ठोंबरे यांची पक्षाकडून कानउघाडणी करण्यात आली आहे. निवडणुकीसंदर्भात घाई गडबडीत चर्चा करणे हा पुण्याच्या राजकीय संस्कृतीचा अपमान आहे, अशा शब्दांत राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी पाटील यांच्या मागणीसंदर्भात नाराजी व्यक्त केली.

भारतीय जनता पक्षाच्या कसबा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मुक्ता टिळक यांचे कर्करोगाच्या आजाराशी झुंज देताना निधन झाले. त्यामुळे कसबा विधानसभेची जागा रिक्त झाली असून ही जागा बिनविरोध करण्यासंदर्भातील हालचाली पक्षाकडून सुरू आहेत.

## पंतप्रधान मोदींबद्दल आक्षेपार्ह विधान

### मुख्यमंत्री शिंदेंनी झापल्यानंतर मिटकरींची दिलगिरी



**नागपूर : प्रतिनिधी**

राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान मंगळवारी (दि. २७) विधान परिषदेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांना खडे बोल सुनावले. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत आक्षेपार्ह विधान केल्याप्रकरणी मुख्यमंत्री शिंदे यांनी सभागृहात नाराजी व्यक्त केली आणि मिटकरींना संसदीय संस्कृतीची आठवण करून दिली. अखेर मिटकरींनी दिलगिरी व्यक्त केली.

पंढरपूर कॉरिडोअरच्या मुद्द्यावर विषय मांडताना राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचा रावण असा उल्लेख केला. त्यावर तातडीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नाराजी व्यक्त केली. देशाच्या पंतप्रधानांचा आदर राखणे हे एक नागरिक आणि जनतेचा प्रतिनिधी म्हणून आपले कर्तव्य आहे. पंतप्रधान देशाचे नेतृत्व करीत असतात. त्यांच्याबाबत असे वक्तव्य करणे चुकीचे आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधी म्हणून बोलताना आपण तारतम्य बाळगले पाहिजे, अशा शब्दांत मुख्यमंत्री शिंदे यांनी आमदार मिटकरी यांना सुनावले.

अमोल मिटकरींच्या विधानावरून विधान परिषदेत जोरदार गदारोळ पाहायला मिळाला. या वेळी उपसभापती निलम गोऱ्हे यांनी हस्तक्षेप करीत मिटकरी यांनी केलेले विधान पटलावरून काढून टाकण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, सत्ताधाऱ्यांनी मिटकरी यांच्या माफीनाम्याची मागणी केली. देशाच्या पंतप्रधानांबाबत बोलताना विचारपूर्वक बोलले पाहिजे, अशी भावना सभापती गोऱ्हे यांनीही व्यक्त केली. अखेर मिटकरी यांनी केलेल्या विधानाबाबत दिलगिरी व्यक्त केली.

दरम्यान, आमदार मिटकरी यांच्या विधानाबद्दल संताप व्यक्त होत आहे. एखाद्या लोकप्रतिनिधीने देशाच्या पंतप्रधानांबाबत असे उद्गार काढणे चुकीचे असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

## केंद्राकडून सहा प्रकल्पांसाठी तब्बल ६५२ कोटींची तरतूद

### मुंबई-पुण्यासह राज्यातील विकासकामांना मिळणार गती

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यांतील सहा विविध प्रकल्पांसाठी केंद्र शासनाने एक हजार ३०४ कोटी रुपयांच्या प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे. त्यातील पहिल्या टप्प्यामध्ये ५० टक्के अर्थात ६५२ कोटी रुपयांचा निधी केंद्र शासनाकडून राज्याला मिळणार आहे. त्यानुसार राज्याच्या नगर विकास विभागाने एमएमआरडीए, पीएमआरडीए आणि सिडको प्रशासनांना ६५२ कोटी रुपयांचा निधी वळता केला आहे. त्यामुळे राज्यातील या सहा प्रकल्पांना आता गती मिळणार आहे.

या प्रकल्पांमध्ये मुंबईतील एमएमआरडीएचा शिवडी-वरळी उन्नत मार्ग, कुर्ला ते वाकोला उड्डाणपूल आणि बीकेसी ते एलबीएस उड्डाणपुलावरील उन्नत मार्गिका तसेच बीकेसी ते वाकोला जंक्शन उन्नत मार्गिकेचा समावेश आहे. त्याचप्रमाणे पुणे विद्यापीठ चौकातील पीएमआरडीए अंतर्गत मेट्रो रेल मार्गिकेसोबत एकात्मिक दुमजली उड्डाणपुलाची उभारणी होणार आहे. याशिवाय सिडको अंतर्गत कोंढाणे आणि बाणगंगा प्रकल्प पाणीपुरवठा योजना मार्गी लावण्याचाही सरकारचा प्रयत्न असेल.

#### कुठल्या प्रकल्पासाठी किती तरतूद?

**एमएमआरडीए**
- शिवडी-वरळी उन्नत मार्गासाठी २५० कोटी रुपये
- कुर्ला ते वाकोला उड्डाणपूल आणि बीकेसी ते एलबीएस उड्डाणपूल उन्नत मार्गासाठी ८७ कोटी ५० लाख रुपये
- बीकेसी ते वाकोला जंक्शनसाठी २२ कोटी ५० लाख रुपये

**पीएमआरडीए**
- पुणे विद्यापीठ चौकात मेट्रो रेल मार्गिकेसोबत एकात्मिक दुमजली उड्डाणपुलासाठी ३७ कोटी ५० लाख रुपये

**सिडको**
- कोंढाणे प्रकल्प पाणीपुरवठा योजनेसाठी १२५ कोटी रुपये
- बाणगंगा प्रकल्प पाणीपुरवठा योजनेसाठी १२९ कोटी ५० लाख रुपये

## पनवेलमध्ये भाजप महिला मोर्चाची बैठक उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष महिला मोर्चाच्या वतीने पक्षसंघटना अधिक मजबूत करण्यासाठी तसेच करण्यात येणाऱ्या कामांचा आढावा घेण्याकरिता महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक सर्वत्र घेण्यात येत आहे. त्यानुसार पनवेल तालुका महिला मोर्चाची आढावा बैठक मंगळवारी (दि. २७) दक्षिण रायगड सरचिटणीस डॉ. मंजुषा कुद्रीमोती यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात झाली.



या बैठकीस महिला मोर्चाच्या प्रदेश कार्यकारिणी सदस्य प्रज्ञा धवन, रश्मी लुडबे, सुषमा मसुरकर, पनवेल तालुका अध्यक्ष रत्नप्रभा घरत, शहर अध्यक्ष वर्षा नाईक, माजी नगरसेविका दर्शना भोईर, उरणच्या माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, पनवेल तालुका उपाध्यक्ष समिना साठी, चिटणीस शिल्पा म्हात्रे, शहर सरचिटणीस सपना पाटील, सचिव स्नेहल खरे, आशा मुंडे, नीता मंजुळे, निर्मला घरत, तृप्ती चौरे, निता अधिकारी, खारघर शहर अध्यक्ष साधना पवार, कामोठे शहर अध्यक्ष वनिता पाटील, उरण तालुका अध्यक्ष राणी म्हात्रे, सदस्य शमिता ठाकूर तसेच मोना आडवाणी, साधना पवार, दुर्गा सहानी, रश्मी भारद्वाज, अश्विनी भुवड यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्त्या महिला उपस्थित होत्या.

या वेळी रत्नप्रभा घरत यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली महिला मोर्चाच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या कामांची माहिती उपस्थितांना दिली तसेच महिला मोर्चाच्या सर्व पदाधिकारी एकजुटीने व उत्साहाने काम करीत भाजप घराघरापर्यंत पोहचवित असल्याचे सांगितले.

प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात येत असलेल्या या बैठकीत धन्यवाद मोदीजी कार्ड, एसईओचे फॉर्म, सोशल मीडियाच्या माध्यमातून अधिकाधिक प्रभावीपणे काम करण्याच्या दृष्टिकोनातून ट्विटर व फेसबुकवर अकाउंट बनवणे तसेच व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप तयार करून महिला संघटना मजबूत करणे या विषयांचा आढावा घेण्यात आला.

# सप्टेंबर २०२३पर्यंत लंपीची लस तयार होणार

## ■ पशुसंवर्धनमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची विधान परिषदेत माहिती

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्यातील ३३ जिल्ह्यात एक लाख ७८ हजार ७२ गोवर्गीय जनावरे लंपी चर्मरोगाने बाधित झाले होते, मात्र वेळेत १०० टक्के लसीकरण केल्याने पशुधनाचा मृत्यू कमी झाला आहे. सप्टेंबर २०२३पर्यंत लसीकरणात महाराष्ट्र स्वयंपूर्ण होणार असून राज्यात ही लस तयार होणार असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी विधानपरिषदेत दिली.

प्रश्नोत्तराच्या तासात सदस्य रणजितसिंह मोहिते पाटील यांनी, लंपी चर्मरोगाबाबत प्रश्न उपस्थित केला होता. प्रश्नाला उत्तर देताना मंत्री विखे-पाटील बोलत होते.

विखे-पाटील यांनी सांगितले की, राज्यातील काही जिल्ह्यात लंपी आजार बळावला होता. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार तातडीने लसीकरणाचा निर्णय घेतला. राज्य शासनाने १०० टक्के लसीकरण गतीने केल्याने पशुधनाचा मृत्यू दर कमी झाला. प्रत्येक जिल्ह्यात औषध बँक आणि तीन कोटी रुपये दिले. राज्य शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचना केंद्र सरकारने स्विकारल्या आहेत.



पशुधनाचा मृत्यू झाल्यास राष्ट्रीय आपत्ती निवारण धोरणातील आर्थिक निकषांनुसार अर्थसाहाय्य देण्यात येत आहे. यामध्ये मृत गाय ३० हजार, बैल २५ हजार आणि वासराला १६ हजार रुपये देण्यात येत आहेत, मात्र यामध्ये आणखी वाढ करण्याबाबत राज्य शासन सकारात्मक निर्णय घेईल, असेही त्यांनी सांगितले. आतापर्यंत ३३८३.८५ लाख रुपयांचा निधी मृत पशुधनाच्या पशुपालकांना वाटप केला आहे. उर्वरित पशुपालकांना १५ दिवसात मदत देण्यात येईल. पशुवर स्वतः उपचार केले असल्यास शेतकऱ्यांना योग्य परतावा दिला जाईल. शिवाय पशुसंवर्धन दवाखान्यातील रिक्त जागा येत्या दोन महिन्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येतील, असेही उपप्रश्नाला उत्तर देताना विखे-पाटील यांनी सांगितले.

### कायमस्वरूपी विमा योजना सुरू करणार

राज्यात पशुधनाला अनेक आजरांचा सामना करावा लागतो. यामुळे पशुपालकाचे नुकसान होऊ नये यासाठी कायमस्वरूपी मदत व्हावी म्हणून सर्व जनावरांसाठी व्यापक स्वरूपात विमा योजना सुरू करण्याचा विचार असल्याचे विखे पाटील यांनी उत्तर देताना सांगितले.

# 'समृद्धी'लगतच्या २८ शेतकऱ्यांना १० लाख ५३ हजारांची भरपाई



**नागपूर : प्रतिनिधी**

समृद्धी महामार्गाच्या बांधकामादरम्यान कंत्राटदारांच्या वाहनांची वाहतूक असलेल्या परिसरातील शेतीपिकांचे धुळीमुळे झालेल्या नुकसान भरपाईपोटी २८ शेतकऱ्यांना १० लाख ५३ हजार ५३५ रुपयांची भरपाई कंत्राटदारामार्फत अदा करण्यात आली आहे. याबाबत शेतकऱ्यांचे अन्य प्रश्न सोडविण्यासाठी विधिमंडळाच्या अधिवेशनानंतर बैठकीचे आयोजन करण्यात येईल, असे मंत्री शंभूराज देसाई यांनी मंगळवारी (दि. २७) विधानसभेत सांगितले.

विधानसभेत सदस्य दादाराव केचे यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित केला होता, त्यावेळी मंत्री देसाई बोलत होते. त्यांनी सांगितले की, उपविभागीय अधिकारी, आर्वी यांच्यामार्फत कळविण्यात न आलेल्या, ईपीसी कंत्राटदाराने त्यांच्या पातळीवर चार शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांची भरपाई अदा करण्यात आली आहे. प्रमाणित नुकसान भरपाईच्या मोबदल्याची खबरदारी म्हणून कंत्राटदाराच्या ऑक्टोबर २०२१च्या देयकातून दहा लाखांचा निधी रोखण्यात आला आहे. महामार्गाच्या संरक्षक भिंतीमुळे लगतच्या शेतात पाणी साचू नये म्हणून आवश्यक तेथे पाणीप्रवाह सुरळीत करण्यासाठी नाली देण्यात आली आहे. पावसाचे पाणी शेतात जमा होत असल्यास त्या पाण्यास संरक्षक भिंतीखालून मार्ग काढून महामार्गाच्या हद्दीत येऊ देण्याच्या सूचना संबंधित शेतकऱ्यांना ईपीसी कंत्राटदारांमार्फत देण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांना वहिवाटीचे रस्ते, पाइप टाकून रस्ता सुरळीत करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# रस्ता ओलांडणाऱ्या महिलेला एसटीने चिरडले

**अलिबाग : प्रतिनिधी**

एसटीला थांबवण्याच्या प्रयत्नात रस्ता ओलांडणाऱ्या आदिवासी महिलेचा एसटी बसखाली चिरडल्याने जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. हा अपघात आगरसुरे फाट्यावर मंगळवारी (दि. २७) सकाळी घडला. रंजना किसन भस्मा (३० रा. सडावाडी, बेणसे, पेण) असे या आदिवासी महिलेचे नाव आहे.

अलिबाग आगाराची (एमएच १४ बीटी २२७३) सासवणे-पनवेल बस सकाळी ८.२० वाजता सासवणे येथून निघाली. ही बस आगरसुरे फाटा येथे आली असता अलिबागकडे जाणाऱ्या रंजना किसन भस्मा यांनी बसचालकाला हात करीत बस थांबवण्याचा प्रयत्न करीत रस्ता ओलांडू लागल्या, मात्र चालक शैलेश केशव पाटील यांनी बस न थांबविल्याने बसची जोरदार धडक बसून रंजना किसन भस्मा या बसच्या चाकाखाली चिरडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्या सोबत असलेल्या पती किसन भस्मा यांच्या समोरच त्यांचा अपघात झाला. त्यांना जिल्हा रुग्णालयात आणले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मृत घोषित केले. बसचालक शैलेश पाटील हा मांडवा सागरी पोलीस ठाण्यात स्वतः हजर झाला.

# दुचाकी चोरी करणारी टोळी २४ तासांत जेरबंद

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

शहरात गेल्या काही दिवसांपासून दुचाकी चोरीचे प्रकार वाढल्याने खोपोली पोलीस सतर्क झाले होते. त्या अनुषंगाने पोलिसांनी तपास करीत या टोळीला २४ तासांत जेरबंद केले आहे.



खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी संजय शुक्ला यांचे सूचनेप्रमाणे खोपोली पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांचे मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने वरची खोपोली व काटरंग परिसरातील गुन्ह्याचा तपास करीत असताना सीसीटीव्ही फुटेजमधून गुन्ह्यामध्ये वापरलेल्या चारचाकीचा नंबर प्राप्त केला. आरोपी हे कुर्ला चुनाभट्टी भागातील कुरेशीनगर येथील असल्याची माहिती मिळाली. तपास पथकाने त्या ठिकाणी जाऊन चोरीस गेलेल्या दोन दुचाकी, चोरी करताना वापरलेली चारचाकी (क्र. एमएच ०२ एव्ही ३३०३) तसेच तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली आहे.

आरोपींकडून पोलिसांनी एकूण दीड लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्याचबरोबर अटक आरोपींवर यापूर्वी तीन ते चार गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे.

# दिव्यांग प्रमाणपत्र वितरणात रायगड जिल्ह्याची उल्लेखनीय कामगिरी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

विविध शासकीय विकास कामांना गती देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने राबविलेल्या आजादी का अमृत महोत्सव मोहिमेंतर्गत रायगड जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींना विविध शासकीय सोयीसुविधांसाठी आवश्यक असलेले दिव्यांग प्रमाणपत्र व युडीआयडी कार्ड तातडीने वितरित करण्यात रायगड जिल्ह्याने उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

या मोहिमेंतर्गत रायगड जिल्ह्याने दिव्यांग कल्याण आयुक्तालय, पुणे यांनी प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार एकूण २८ हजार २६६ पैकी २० हजार ७५ प्रमाणपत्र (९५ टक्के) दिव्यांग व्यक्तींना प्रमाणपत्रे वितरित करून राज्यामध्ये सातवा क्रमांक मिळवून रायगड जिल्हा परफॉर्मन्स लेव्हलच्या टॉप ब्रॅकेटमध्ये असल्याचे म्हटले आहे, तसेच सहा हजार ७२७ प्रकरणे फेटाळण्यात आली असून अद्याप एक हजार ४६४ प्रमाणपत्रांचे वाटप करण्याचे काम प्रलंबित आहे.

दिव्यांग प्रमाणपत्र वितरित करताना दिव्यांग बांधवांमध्ये कोविड-१९च्या प्रतिबंधात्मक लसीकरणाविषयीदेखील जनजागृती करण्यात येत असून दिव्यांगांना लस घेण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे.

प्रमाणपत्र वाटप मोहीम यशस्वी करण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रमोद गवई, निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य) डॉ. रविंद्र रोकडे व तत्कालीन निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. गजानन गुंजकर यांनी विशेष नियोजन व मार्गदर्शन केले.



# पेणमधील खारबंदिस्ती पूर्ववत करण्याची शेतकऱ्यांची मागणी

**पाली : प्रतिनिधी**

तालुक्यातील खारमाचेला, खारचिर्बी, व जुईअब्बास विभागातील साधारणतः २७०० एकर शेतीत खारे पाणी शिरून सुपीक शेती नापीक होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे खारलँड विभागाने शेतीचा बचाव करणारी खारबंदिस्ती खारबंदिस्ती पूर्ववत करावी, अशी मागणी खारमाचेला विभागातील शेकडो शेतकऱ्यांनी केली आहे. या संदर्भात खारलँड विभागाला सोमवारी (दि. २६) निवेदन देण्यात आले.

खारलँड विभाग व प्रांताधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, खारमाचेला, खारचिर्बी व जुईअब्बास खारभूमी योजनेमध्ये खारमाचेला, खारचिर्बी, खारघाट, खार जांभेला, खारढोम्बी, खार म्हैसबाड, खारपाले, खारमौजे, खारदेवळे, खारकासू, खारबुर्डी, खारसालींदे, खारपांडापूर ही महसूल गावे समाविष्ठ आहेत. येथील खारबंदिस्ती व उघाड्यांची दुरुस्ती बऱ्याच वर्षांपासून करण्यात आली नाही. यामुळे खांडीमधून समुद्राचे खारे पाणी जाऊन सुपीक जमिनी नापीक होत आहेत. हा बंधारा त्वरित बांधावा, अन्यथा आम्ही सर्व शेतकरी आत्मदहन करू, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

या वेळी शेतकरी तुळशीदास कोठेकर, अंकुश म्हात्रे, निलेश कोठेकर, दीपक कोठेकर, समीर म्हात्रे, प्रभाकर कोठेकर, प्रशांत म्हात्रे, अभिमन्यू कोठेकर, परशुराम मोकल, अनिल कोठेकर, अमोल म्हात्रे, विजय मढवी, कृष्णा म्हात्रे, हरेष कोठेकर, स्वप्नील सीताराम कोठेकर, अमित पाटील, हेमंत कोठेकर, किशोर मोकल, प्रभाकर कोठेकर, जगदीश कोठेकर, सुनील मोकल आदींसह शेतकरी उपस्थित होते.

# पेण येथे अश्व एज्युकेशनतर्फे विज्ञान प्रदर्शन उत्साहात

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील अश्व एज्युकेशन पॅरामेडिकल सायन्स कॉलेजच्या प्रथमवर्ष नर्सिंग, लॅब टेक्निशियनच्या १२१ विद्यार्थ्यांनी नुकतेच मानवी रचनेवर आधारित ६१ मॉडेल्सची व सार्वजनिक कॉलेज पेण येथे २१ मॉडेल्सची मांडणी विज्ञान प्रदर्शनात केली. प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य अश्विनी राठोड, संचालक राजेश राठोड यांनी केले.

डी.फार्मसीचे प्रथम वर्ष विद्यार्थी दिपाली प्रजापती, आएशा बेमजी, स्नेहा पाटील, भारती पाटील, अथर्व पाटील, प्रेम शहा, विजय पासवान, मेहबूब यांनी शिक्षिका प्रिया मिस्त्री, सविता उमरटकर, फैजल अन्सारी यांचे मार्गदर्शनाखाली विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केले होते.

६१ मानवी आकार मॉडेलमधून शरीराचे कार्य, बाह्य घटनांचा किती प्रभाव होतो आदी विषयांवर विद्यार्थ्यांनी विचार मांडले. हेच विज्ञान प्रदर्शन पुन्हा सार्वजनिक कॉलेज, पेण येथेही झाले.



# महानगर गॅस व्यवस्थापकीय संचालकपदी आशु सिंघल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महानगर गॅस लिमिटेडच्या व्यवस्थापकीय संचालकपदी आशु सिंघल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी शुक्रवारी (दि. २३) पदभार स्वीकारला.



सिंघल हे एनआयटी, सिल्चर येथून मेकॅनिकल इंजिनिअरिंगमध्ये पदवीधर असून त्यांनी ऑपरेशन मॅनेजमेंटमध्ये स्पेशलायझेशनसह बिझनेस डमिनिस्ट्रेशन (एमबीए) पदवी संपादन केली आहे. येथे रुजू होण्यापूर्वी ते गेल (इंडिया) लिमिटेड येथे कार्यकारी संचालकाच्या रूपाने कॉर्पोरेट स्ट्रॅटजी, प्लॅनिंग अँड ड्व्होकसी, रिस्क मॅनेजमेंट, टोटल क्वालिटी मॅनेजमेंट आणि सस्टेनेबल डेव्हलपमेंट विभागांचे प्रमुख होते. ते ओएनजीसी पेट्रो डिशन्स लि. (ओपीएएल)च्या आणि तालचेर फर्टिलायझर लि. (टीएफएल)च्या मंडळावर संचालक म्हणूनही कार्यरत आहेत. यापूर्वी ते महानगर गॅस लि. (एमजीएलच्या मंडळावर संचालक राहिलेले आहेत.सिंघल यांनी भारतीय औद्योगिक शिष्टमंडळाचे युएस सरकारच्या इंटरनॅशनल लीडरशीप प्रोग्रॅममध्ये प्रतिनिधित्वदेखील केले आहे. त्यांच्या नियुक्तीनंतर त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# कृषी विभाग व स्वदेस फाउंडेशन यांच्यात सामंजस्य करार

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय व स्वदेस फाउंडेशन यांनी कृषी विकास कार्यक्रमांतर्गत सामंजस्य करार करण्यात आला. या करारावर स्वदेस फाउंडेशनच्या संस्थापक झरीना स्क्रूवाला व प्रकल्प संचालक आत्मा तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्ज्वला बाणखेले यांनी सह्या केल्या.




या वेळी 'स्वदेस'चे मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेश वांगे, संचालक प्रदीप साठे, उपसंचालक तुषार इनामदार, नीता हरमलकर, महाव्यवस्थापक प्रसाद पाटील, अफशान शेख, उपसंचालक जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय काळभोर, उपसंचालक आत्मा तथा नोडल अधिकारी (स्मार्ट) सतीश बोऱ्हाडे आणि पुरवठा व मूल्य साखळी तज्ज्ञ जिल्हा अंमलबजावणी कक्ष (स्मार्ट) भाऊसाहेब गावडे उपस्थित होते.

या करारांर्गत रायगड जिल्ह्यामध्ये स्वदेस फाउंडेशन काम करत असलेल्या गावांमध्ये तीन वर्षांमध्ये पोलादपूर, महाड, माणगाव, तळा, म्हसळा, श्रीवर्धन व सुधागड तालुक्यामधील शेतकऱ्यांसाठी मँगो नेट नोंदणी, मँगो जीआय नोंदणी, शेतकरी कंपनीची स्थापना, शेतकरी गट निर्मिती, प्रधानमंत्री सूक्ष्म खाद्य उद्योग योजना प्रकल्प अंमलबजावणी, स्मार्ट प्रकल्प अंतर्गत शेतकऱ्यांना लाभ, बांबू विलेज निर्मिती, किसान क्रेडिट कार्ड नोंदणी व लाभ, सौरऊर्जा कुंपण लाभ, प्रधानमंत्री पिक विमा योजना लाभ व शेतकऱ्यांना प्रशिक्षण यावर स्वदेस फाउंडेशन व कृषी विभाग समन्वयाने काम करणार आहेत.

कृषी विभागाच्या योजना जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी स्वदेस फाउंडेशन व कृषी विभाग प्रयत्न करेल, असे मत स्वदेस फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेश वांगे यांनी व्यक्त केले. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन उज्ज्वला बाणखेले यांनी केले.

# रायगड प्रदक्षिणेत ६६५ साहसवीरांचा सहभाग

**महाड : रामप्रहर वृत्त**

दमछाक होणारे चढउतार, खडतर वाटा आणि चिंचोळ्या खिंडींना आव्हान देत आणि रायगडच्या विपुल जैवविविधतेचा अनुभव घेत ६६५ साहसवीरांनी रायगड प्रदक्षिणा पूर्ण केली. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्व जण आपल्या शारीरिक शक्तीची परिक्षा घेत यात सहभागी झाले होते. रायगड प्रदक्षिणेचे हे ३१वे वर्ष होते.

महाड युथ क्लब व रायगड जिल्हा परिषदेच्या वतीने रविवारी (दि. २५) ही प्रदक्षिणा पार पडली. राज्याच्या विविध भागातून आलेल्या प्रदक्षिणार्थींसह स्थानिक प्रदक्षिणार्थीही यात सहभागी झाले होते. रायगड किल्ल्याच्या पायथ्याला असलेल्या पाचाड गावापासून कडाक्याच्या थंडीत सकाळी ६ वाजता स्पर्धेला सुरुवात झाली. गर्दी होऊ नये, यासाठी ठराविक जणांचा गट दर १५ मिनिटांनी सोडले जात होते.

कधी तीव्र उतार तर कधी चढ, पाय सरकतील अशी पायवाट, मध्येच दाट वनराईचा अडथळा यातून वाट काढत अनेक जण मार्गस्थ होत होते. मध्येच सावलीला विश्रांतीही घेतली जात होती. प्रदक्षिणा पूर्ण करणाऱ्या सर्व प्रदक्षिणार्थींना संस्थेतर्फे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यात ८१ वर्षांचे वडील व त्यांचा ५१ वर्षांचा मुलगा या दोघांनीही ही प्रदक्षिणा पूर्ण केली. या वेळी युथ क्लबचे राजेश बुटाला, संतोष सकपाळ, प्रणित गांधी, श्रद्धा जोशी यांच्यासह युथ क्लबचे सर्व सदस्य उपस्थित होते.

# 'शारीरिक आणि मानसिक विकासासाठी योग आवश्यक'

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कुटुंबातील सर्व सदस्यांना मानसिक आणि शारीरिक बळ वाढण्यासाठी योगा अत्यावश्यक आहे. महिला योग दिनी हा स्तुत्य उपक्रम घेतला असून असे कार्यक्रम नवी मुंबईत सर्वत्र व्हावे, यासाठी मी प्रयत्नशील राहीन, अशी ग्वाही भाजपचे माजी सभापती अशोक गुरखे यांनी महिला योग दिनी सीबीडी येथे बोलताना दिली.

भारतीय योग संस्थेच्या वतीने महिला योग शक्ती दिवस सीबीडी येथे साजरा करण्यात आला. या वेळी अशोक गुरखे बोलत होते. भारतीय योग संस्थेच्या विभागीय मंत्री राजकुमारी सिंग यांनी महिलांना योगाचे महत्त्व पटवून दिले. योगाचे विविध प्रकार प्रात्यक्षिक करण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून के. जे. सोमय्या कॉलेजच्या निवृत्त उपप्राचार्य वीणा सुरेश, विभावरी कदम. जे. जे. सिंग, विजय गुलाटी, स्मिता दुधीवळ, वर्षा काटकर आदी उपस्थित होते.



# अवैध वाहतूकदारांना भाजपचा दणका

## नवभारतीय शिववाहतूक संघटनेचा यशस्वी पाठपुरावा

### आरटीओने केला दोन लाख ७८ हजारांचा दंड वसूल

**पनवेल : वार्ताहर**

भारतीय जनता पक्ष ट्रान्सपोर्ट सेल प्रणित नव भारतीय शिव वाहतूक संघटनेने अवैध वाहतूक करणाऱ्या विरोधात आरटीओ कार्यालयात आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. नव भारतीय शिव वाहतूक संघटनेच्या आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर प्रादेशिक परिवहन कार्यालय कामाला लागले असून वायुवेग पथकाद्वारे अवैध वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करणाऱ्यास सुरुवात केली असून त्यांच्याकडून दोन लाख ७८ हजारांचा दंड वसूल केला.


(प्रातिनिधिक छायाचित्र)

राज्यभरात चालत असलेल्या अवैध वाहतूक करणाऱ्यांवर कडक कारवाई झाली नाही तर २८ डिसेंबर रोजी आमदार आशिष शेलार आणि भारतीय जनता पक्ष ट्रान्सपोर्ट सेल प्रणित नव भारतीय शिव वाहतूक संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष हाजी अराफत शेख यांच्या उपस्थितीत आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संघटनेचे महाराष्ट्र सरचिटणीस निलेश निम्हण व रायगड जिल्हा अध्यक्ष संकेत पाटील यांनी दिला होता.

आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर प्रादेशिक परिवहन कार्यालय कामाला लागले असून वायुवेग पथकाद्वारे कळंबोली मॅक्डोनाल्ड, खालापूर टोल नाका तसेच जुना मुंबई–पुणे महामार्गावर विशेष तपासणी मोहिम राबवण्यात आली. तपासणीदरम्यान प्रवाशांच्या वैयक्तिक सामाना व्यतिरिक्त बसमधील व्यापारी मालाची अवैध वाहतूक करणाऱ्या २१ प्रवासी बसेसवर कारवाई करण्यात आली. यामध्ये त्यांच्याकडून दोन लाख ७८ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात असून यापुढेसुद्धा ही कारवाई पुढे सुरू राहणार असल्याचे प्रादेशिक वरिवहन कार्यालयाद्वारे देण्यात आली आहे. त्यामुळे तूर्तास सदर आंदोलन स्थगित करण्यात आल्याची माहिती संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष संकेत पाटील यांनी सांगितले.





**पनवेल : बाबा जोरावर सिंहजी व बाबा फतेह सिंहजी यांनी धर्माच्या रक्षणासाठी केलेल्या सर्वोच्च बलिदानाचे स्मरण करून संपूर्ण देशात भक्तिभावाने वीर बाल दिवस साजरा करण्यात आला. यानिमित्ताने खांदेश्वर स्टेशन मैदानावर शहीदी समागमचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास भाजप रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत शीख बांधवाशी संवाद साधला व त्यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी मान्यवरांसह भाजप युवा नेते हॅप्पी सिंग व सहकारीही उपस्थित होते.**

# आपटा गावात जलजीवन योजनेबाबत बैठक

**रसायनी : प्रतिनिधी**

आपटा गावात जलजीवन योजना जी केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून सुरू केली आहे. याबाबत आपटा ग्रामस्थ व पाणी कमिटीची बैठक झाली. यामध्ये एकत्रितपणे येऊन या योजनेच्या माध्यमातून गावासाठी पाणी घ्यावे, असा निर्णय घेण्यात आला.

यासोबतच योजनेचा लाभ घ्यावा व गावासाठी पाणी पुरवठा सुरू करावे असे सर्व ग्रामस्थ यांनी सांगितले. ही योजना एक कोटी पन्नास लाख रुपयांची आहे. ही योजना आमदार महेश बालदी यांनी आणली आहे, असा फलक गावात लावला आहे व त्यांचे आभार मानले आहेत.

या बैठकीमध्ये जिल्हा परिषदेचे मीटकरी आणि या योजनेचे ठेकेदार व आपटा ग्रामस्थ यामध्ये सरपंच नाजनीन पटेल, उपसरपंच मयुर शेलार, ग्रामविकास अधिकारी शेंडगे, वृषभ धुमाळ, मारुती चव्हाण, भाजप तालुका उपाध्यक्ष ॲड. संजय टेंबे, गणेश सांवत, स्वप्नील भोवड, गोपाळ सावंत, मृणाल कुलकर्णी, हेटवणे पाणी कमेटी अध्यक्ष सैजाद व ग्रामस्थ उपस्थित होते.





### पनवेलमध्ये वृद्ध महिलेची फसवणूक

**पनवेल :** एका वृद्ध महिलेची फसवणूक करून लाखो रुपये किमतीचे दागिने लंपास केल्याची घटना शहरातील मिरची गल्लीच्या नाक्याजवळ घडली आहे. कोलानजी कारुप्पण करथान (वय ६२, रा. तक्का) या पनवेल येथील गणेश मार्केट येथे बांगड्या घेण्यासाठी गेल्या असताना दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांना अंगावरील सोने कोणीतरी चोरून नेईल असे सांगून त्यांचे सोने पिशवीत काढून ठेवण्यास सांगितले. पिशवी खाली ठेवली असता त्या दोघांनी हातचलाखीने जवळपास एक लाख २२ हजार रुपये किमतीचे सोन्याची दागिने असलेली पिशवी घेऊन ते पसार झाले. याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



**पनवेल : तालुक्यातील उमरोली गावात निर्मल पेय जल या पाणी योजनेचा शुभारंभ करण्यात आला. या वेळी भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, माजी सरपंच शांताराम पोपेटा, नेरे जि. प. अध्यक्ष सुनील पाटील, माजी सदस्य नारायण माळी, उमरोली गाव अध्यक्ष नारायण मढवी, ग्रामपंचायत उपसरपंच रोशन पोपेटा, सदस्य शुभांगी मढवी, हनुमान माळी, नरेश मढवी, दशरथ मढवी, अशोक पाटील, अविनाश चौधरी, जनार्दन माळी, संतोष पाटील, शाम माळी, देहू माळी, अरुण मढवी, स्वप्नील माळी तसेच ज्ञानाई महिला हरिपाठ मंडळाचे सदस्य उपस्थित होते.**

## निवडक

### कळंबोलीत सोनसाखळी हिसकावली

**पनवेल :** कळंबोली वसाहतीमध्ये पायी जात असलेल्या एका महिलेस मोटरसायकल वरून आलेल्या दोघांपैकी एका व्यक्तीने त्यांना धक्का मारून त्यांच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावून पसार झाल्याची घटना घडली आहे. कळंबोली येथील करावली चौकात हेलन नाडार या पायी जात असताना दुचाकीस्वाराने त्यांना धक्का मारला त्यानंतर दुचाकीवरील एकाने त्यांच्या गळ्यातील सोन्याची सोनसाखळी हिसकावून ते पसार झाले.

### स्टेशन परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** रेल्वे स्टेशन परिसरातील लोकल लाईनच्या समोरील मोकळ्या जागेत कट्टयाच्या बाजूस अनोळखी महिलेचा मृतदेह आढळून आला आहे. याप्रकरणी पनवेल रेल्वे पोलीस तिच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत. महिलेचे अंदाजे वय ४२ वर्षे असून तिची उंची चार फूट आठ इंच, अंगाने सडपातळ, रंग सावळा, केस बारीक काळे, दात शाबूत, नाक बसके, अंगात जांभळा गाऊन आहे. या महिलेबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे (०२२–२७४६७१२२) किंवा पोलीस निरीक्षक प्रकाश होवाळ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



**उरण : दिघोडे येथील कंठवली या ठिकाणी हॉटेल रिव्हरसाईड सुरू झाले आहे. हॉटेलच्या उद्घाटनावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांची उपस्थिती लाभली. या वेळी आशिष म्हात्रे, प्रफुल पाटील, सौरभ गायकर, छाया पाटील आदी उपस्थित होते.**



**पनवेल : महापालिकेच्या मुख्यालयात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. या वेळी उपायुक्त कल्पिता पिंपळे, सामान्य प्रशासन विभागप्रमुख दशरथ भंडारी, भांडार विभागप्रमुख प्रकाश गायकवाड, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी आदी उपस्थित होते.**

# गव्हाण विद्यालयात दहावीच्या वर्गांची पालकसभा

### चेअरमन अरुणशेठ भगत यांची प्रमुख उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये इयत्ता दहावीच्या वर्गातील विद्यार्थी, पालक, शिक्षक व स्थानिक शाळा समितीच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांच्या पालकांची पालक सभा विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन आणि रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी व समन्वय समितीचे सदस्य अरुणशेठ भगत यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

विद्यालयातील इयत्ता दहावी अ ब आणि क अशा वर्गनिहाय झालेल्या पालक सभेला अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्यासह विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, ज्येष्ठ नेते जयवंतराव देशमुख, विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी व रवींद्र भोईर, लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर यांच्यासह वर्गशिक्षक सागर रंधवे, संदीप भोईर व चित्रलेखा पाटील आणि विद्यार्थी, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





एस.एस.सी परीक्षा मार्च २०२३ ला विद्यालयातून प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रथम सत्र परीक्षा निकाला संदर्भात चर्चा करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आयोजित केलेल्या या पालक सभेला अध्यक्षपदावरून संबोधताना विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत यांनी हत्या शैक्षणिक वर्षाच्या उर्वरित कालखंडामध्ये विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे पालकांनी लक्ष द्यावे आणि विद्यार्थ्यांनी आपल्या शंका निरसन संबंधित शिक्षकांकडून करून घ्यावे तसेच सातत्यपूर्ण अभ्यास करून यश संपादन करावे, असे आवाहन केले.

स्थानिक शाळा समितीचे सदस्य विश्वनाथ कोळी यांनीही महत्त्वपूर्ण मार्गदर्शक सूचना केल्या. या वेळी काही पालकांनीदेखील विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण सूचना करून मार्गदर्शन केले.

# दीपक पाटील यांना पुरस्कार

**उरण : बातमीदार**

२९ गाव संघर्ष समितीचे नवी मुंबई अध्यक्ष तथा लोकनेते दि. बा. पाटील नामकरण चळवळीत कार्यशील असणारे सामाजिक कार्यकर्ते दीपक. ह.पाटील (घणसोली) यांना सामाजिक गुणगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नवी मुंबई मधील कोपरखैरणे येथे ज्ञानविकास संस्थेच्या महाविद्यालयाच्या प्रांगणात आगरी समाजाचे १९ वे आगरी साहित्य संमेलन ज्येष्ठ साहित्यिक व मानवरांच्या उपस्थितीत झाले. या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या संमेलनाचे उद्घाटन जी पी पारसिक बँकेचे अध्यक्ष नारायण गावंड यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमावेळी संमेलनाचे स्वागताध्यक्ष ॲड. पी. सी. पाटील, कार्याध्यक्ष–दशरथ पाटील, ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे, आगरी साहित्य विकास मंडळाचे संस्थापक मोहन भोईर, माजी मंत्री जगन्नाथ पाटील, डी. डी घरत,संमेलन कार्यवाह, ॲड. प्रसाद पाटील, दशरथ भगत, रविशेठ पाटील, चंद्रकांत पाटील, पुंडलिक म्हात्रे, चंद्रकांत मढवी, संदीप पाटील, रामनाथ म्हात्रे आदी उपस्थित होते. स्थानिक भूमीपुत्रांना, प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य समाजासाठी, स्थानिक भूमीपुत्रांसाठी अर्पण केलेल्या दीपक. ह. पाटील यांना सामाजिक गुणगौरव पुरस्कार मिळाल्याने त्यांच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# उत्खननात आढळलेली तोफ 'द्रोणागिरी'वर ठेवण्यात यश

**उरण : वार्ताहर**

द्रोणागिरी डोंगराजवळ उत्खननात आढळलेली दुर्मीळ ऐतिहासिक शिवकालीन दोन टन वजनाची तोफ अखेर दोनशे शिवप्रेमीच्या प्रयत्नानंतर द्रोणागिरी किल्ल्यावर रविवारी (दि. २५) ठेवण्यात आली.

मागील वर्षी उत्खननात आढळलेली दोन टन वजनाची आणि साडेसात फूट लांबीची एक शिवकालीन ऐतिहासिक तोफ द्रोणागिरी डोंगरावरील द्रोणागिरी किल्ल्यावर पोहचविण्यासाठी सिकप्रेमी, दुर्गप्रेमी संघटना प्रयत्नशील होत्या. अनेक शिवप्रेमी संघटनाचे १२५



शिवप्रेमींनी ९०० ते १००० मीटर उंचीच्या द्रोणागिरी डोंगरावरील किल्ल्यावर पोहचविण्यासाठी पायथ्यापर्यंत जेसीबीने त्यानंतर चेनकप्पी, रस्सीचा वापर करण्यात आला.

# उरणच्या तलावाला पानवेलीचे पांघरुण

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यात थंडीचा जोर वाढत आहे. यामुळे रब्बी हंगामातील वाल, पावटा, चवळी, मूग व हरबरा ही पिक जोरात बहरू लागले आहे. त्यातच कळंबुसरे गावातील तलावात पान वेलिने पांघरुण घालण्यास सुरुवात केल्याचे सुंदर चित्र पहावयास मिळत आहे.

उरण तालुक्यातील चिरनेर, कळंबुसरे, कोप्रोली, पाणदिवे, नागाव, म्हातवली, केगाव गावातील शेतकरी रब्बी हंगामात आप आपल्या भात शेतीला जोडधंदा म्हणून वाल, पावटा, चवळी, मूग हरबरा या पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात करीत आहेत.



या पिकासाठी थंडी तील वातावरण हे पोषक असल्याने जसजसे थंडीचा जोर वाढत जातो तसतसे वाल, पावटा, चवळी, मूग या पिकाची रोपे बहरू लागतात. मागील चार दिवसांपासून थंडीचा जोर वाढत असल्याने शेतकरी सुखावला आहे. थंडीचा कडाका असाच वाढत राहीला तर रब्बी हंगामातील पीक मोठ्या प्रमाणात येईल, असे मत शेतकरी हसुराम मोकल यांनी व्यक्त केले आहे.

त्यातच वाढत्या थंडीमुळे कळंबुसरे गावातील तलावात पान वेळी वाढत आहे. त्यामुळे संपूर्ण तलावात पानवेलीने सुंदर पांघरुण घातल्याचे चित्र नागरिकांच्या डोळ्यांना भुरळ घालत आहे.

## संपादकीय

# याला म्हणतात हिंमत

कर्नाटक सरकारचा निषेध करणारा ऐतिहासिक ठराव सर्वपक्षाच्या सदस्यांनी एकत्र येऊन महाराष्ट्राच्या विधानसभेत पारित केला हा एक ऐतिहासिक क्षण म्हणावा लागेल. कर्नाटकव्याप्त मराठी भाषिक गावांमध्ये गेली तीन-चार दशके जो अन्याय सुरू आहे, त्याला जोरदार प्रत्युत्तर महाराष्ट्र सरकारने दिले आहे. अशी हिंमत दाखवणारे शिंदे-फडणवीस सरकार हे पहिलेच सरकार आहे.

**बेळगाव, कारवार, निपाणी आणि भालकीसह ८६५ सीमावर्ती गावांना यापुढे महाराष्ट्रातलीच गावे मानण्यात येईल तसेच तेथील नागरिकांना महाराष्ट्राचे नागरिक म्हणूनच वागणूक दिली जाईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी ठरावावरील चर्चेमध्ये जाहीर केले. तसेच सीमालढ्यामध्ये ज्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, त्यांच्या आप्तांना आर्थिक मदत देखील महाराष्ट्रातर्फे दिली जाणार असल्याचे सांगितले. चार महिन्यांपूर्वीपर्यंत महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार होते, परंतु खुर्चीबचाव या एककलमी कार्यक्रमात मश्गुल राहिलेल्या ठाकरे सरकारने सीमावासियांसाठी बोलघेवडेपणापलीकडे काहीही केले नाही. उलट सीमावर्ती भागामध्ये सुरू असलेल्या सरकारी योजना देखील बंद करून टाकल्या. शिंदे-फडणवीस सरकार राजकीय गदारोळाकडे दुर्लक्ष करून शांतपणे निर्णय घेत राहिले, त्याचे हे उदाहरण. या सरकारकडे बोलघेवडेपणा नाही, परंतु कार्यक्षमता आणि हिंमत भरपूर आहे. याचा प्रत्यय मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळाच्या सभागृहात मंगळवारी दिला. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या बेळगाव प्रश्नाची तड लागत नाही तोवर हा प्रदेश केंद्रशासित करावा, अशी सूचना माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली होती, परंतु ही सूचना ठराव मंजूर करण्याअगोदर नाकारण्यात आली. कारण सर्वोच्च न्यायालयात जे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, त्यावर केंद्र सरकार तरी काय निर्णय घेणार? अर्थात कायद्याचे तांत्रिक बारकावे आणि जाण सर्व राजकारण्यांना असते असे नाही. परंतु सरकार म्हणून काही पावले उचलताना कायद्याचे भान ठेवावेच लागते. थोर व्यक्तींच्या अपमानाबद्दल गेले काही महिने महाविकास आघाडीच्या नेत्यांनी गदारोळ उठवला होता. त्या टीकेच्या गदारोळातून महामहीम राज्यपालदेखील सुटले नाहीत. त्याला विधानपरिषदेमध्ये फडणवीस यांनी जे झणझणीत उत्तर दिले, त्याने विरोधकांचे कान साफ झाले असतील. महापुरूषांच्या अवमानाबद्दल बोलताना माजी कायदेमंत्री अनिल परब यांनी सावरकरांचा एकदाही उल्लेख केला नाही याकडे फडणवीसांनी अचूक लक्ष वेधले. इतकेच नव्हे तर स्वातंत्र्यवीरांना 'माफीवीर' असे संबोधणाऱ्या काँग्रेसच्या राहुल गांधी यांच्याविरोधात मूग गिळून का गप्प बसता असा प्रतिसवालदेखील त्यांनी केला. हिंदूंच्या देवादिकांबद्दल बेलगाम बोलणाऱ्या आणि संत-सज्जनांना थोतांड ठरवणाऱ्या 'शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे' पक्षाच्या प्रवक्त्या सुषमा अंधारे यांनाही त्यांनी चार खडे बोल सुनावले. बिहारचे माजी मुख्यमंत्री लालुप्रसाद यादव यांनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना तसेच त्यांच्या परिवाराला महाराष्ट्रातील घुसपैठिया असे म्हटले होते. त्याच लालु यांच्या पुत्राला भेटायला ठाकरे गटाचे नेते जातात, अशी बोचरी आठवणही त्यांनी करून दिली. एकंदरीत मंगळवारचा दिवस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गाजवला असे म्हणावे लागेल. विरोधकांच्या उसन्या अवसानामधील हवाच या दोघांनी काढून घेतली असे दिसले. कर्नाटकच्या विरोधात ठराव करणे आणि त्यासाठी सर्वपक्षीय मान्यता मिळवणे ही अवघड बाब होती, ते शिवधनुष्य शिंदे-फडणवीस सरकारने लीलया पेलल्यामुळे ते दोघेही अभिनंदनास पात्र आहेत.**

# शासनाची सार्वजनिक आरोग्य योजना व कार्यक्रम



(भाग ३)

आरोग्य सेवांचा मूळ उद्देश आरोग्य सुधारणे हा असून, लोकांचे जीवनमान सुधारावे व निरोगीपणे जगता यावे यासाठी, आरोग्य शिक्षण व सेवा यावर भर देण्यात आला आहे. आरोग्य सेवा ही सामाजिक आरोग्य क्षेत्र, यात प्राथमिक आरोग्य सेवा, उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा रुग्णालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांचाही समावेश होतो. या माध्यमातून लोकांना आरोग्य सेवांची उपलब्धता करून देण्यात येते. सामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवून शासनाच्या वतीने त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने विविध योजना आखण्यात आलेल्या आहेत. या आरोग्य सेवा अधिकाधिक लोकाभिमुख झाल्यास लोकांना चांगले आरोग्य लाभून समाजाचे आरोग्य सुधारण्यासाठी नक्कीच मदत होऊ शकते.

निरोगी महाराष्ट्राच्या दृष्टीने विविध महाआरोग्य योजना सामान्य माणसासाठी शासनाच्या वतीने साकारलेल्या आहेत. या लोककल्याणकारी योजनांची माहिती देऊन लोकांनी त्याचा अधिकाधिक उपयोग घेण्यासाठी व त्या लोकाभिमुख करण्यासाठी शासनाचा प्रयत्न आहे, यासाठी सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत त्याचप्रमाणे सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे यांचेदेखील मोलाचे मार्गदर्शन मिळत आहे, असे मनोगत आरोग्य सेवा आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मुंबईच्या संचालक, डॉ. साधना तायडे तसेच आरोग्य सेवा, पुणेचे संचालक, डॉ. नितीन अंबाडेकर यांनी नोव्हेंबर-२०२२ च्या महाराष्ट्र आरोग्य पत्रिकेच्या महाआरोग्य योजना-सार्वजनिक आरोग्य योजना व कार्यक्रम या विशेषांकातून व्यक्त केले आहे. या पुस्तिकेचे संपादन डॉ. कैलास बाविस्कर यांनी केले आहे. चला तर जाणू घेऊया. काय आहेत या आरोग्य योजना, काय आहेत या योजनांचे लाभ.

### किशोरवयीन आरोग्य

राज्यातील किशोरवयीन मुला-मुलींची संख्या (वय वर्ष १० ते १९ ) एकूण लोकसंख्येच्या २३ टक्के आढळून येते. किशोरवयामध्ये शारिरिक वाढीच्या वेळी भावनिक, मानसिक, लैंगिक बदल होत असतात. याबाबत समाजामध्ये, कुटुंबामध्ये, शाळा, कॉलेजमधून योग्य माहिती मिळणे दुरापास्त असते. चुकीच्या माहितीमुळे किशोरवयीन मुला-मुलींमध्ये गैरसमज निर्माण होतात. या गोष्टी टाळण्यासाठी किशोरवयीन मुला-मुलींसाठी 'अर्ज' हा कार्यक्रम आर. सी.एच.भाग २ अंतर्गत कार्यान्वित करण्यात आला आहे.

**उद्देश :** किशोरवयीन मुला-मुलींच्या प्रजनन व लैंगिक आरोग्यामध्ये सुधारणा, बालमृत्यू, मातामृत्यू, एकूण प्रजनन दर कमी करणे, प्रसूती काळात निर्माण होणाऱ्या गुंतागुंतीबाबत काळजी घेणे. **उद्दिष्ट :** किशोरवयीन मुला-मुलींना त्यांच्या आरोग्याविषयी समुपदेशन व जनजागृती करणे, सुरक्षित गर्भपात संबंधित सुविधा पुरविणे, किशोरवयीन मुला-मुलींना प्रजनन व लैंगिक आरोग्याबाबत जागृत करून त्यांचा सहभाग या कार्यक्रमात वाढविणे, किशोरवयीन मुला-मुलींना त्यांच्या आरोग्याविषयीच्या समस्यांबाबत माहिती देणे. **अंमलबजावणी पध्दती :** या कार्यक्रमांतर्गत विविध योजनांची अंमलबजावणी केली जात आहे. किशोरवयीन मुला-मुलींना '६३१ क्लिनिक'मार्फत आरोग्याविषयी सेवा पुरविणे, आयोजन करणे. WIFS अंतर्गत लोहयुक्त गोळ्यांचे वाटप करणे. बाह्यसंपर्क कार्यक्रमाचे मासिक पाळीमधील स्वच्छता संवर्धन योजनेंतर्गत ६ रुपये प्रति सॅनिटरी या दरात सॅनिटरी नॅपकिन्सचा पुरवठा करणे.

**सेवा देणाऱ्या आरोग्य संस्था :** राज्यात ६३१ ॲडोलेसेन्ट हेल्थ क्लिनिकची स्थापना केली आहे, त्यांना मैत्री क्लिनिक असे नाव देण्यात आले आहे. हे मैत्री क्लिनिक राज्यातील निवडक जिल्हा सामान्य रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, स्त्री रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये, शहरी भागात व काही प्राथमिक आरोग्य केंद्रात स्थापन करण्यात आली आहेत.

### कार्यक्रमांतर्गत योजना व उपक्रम

मैत्री क्लिनिकमध्ये या कार्यक्रमांतर्गत या किशोरवयीन मुला-मुलींना त्यांच्या आरोग्याविषयी तपासणी, समुपदेशन व मार्गदर्शन केले जोते. या क्लिनिक्समार्फत मासिक पाळीमध्ये उद्भवणाऱ्या समस्या (आहार, एनसीडी, मानसिक आरोग्य, आर.टी.आय. एस.टी.आय., त्वचेच्या समस्या प्रतिबंधक उपायांबाबत (ओ.सी.पील्स, ई.सी.पील्स, आय.यु.डी) बाबत समुपदेशन व तपासणी केली जाते. समुपदेशक किशोरवयीन मुला-मुलींचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने बाह्यसंपर्क कार्यक्रमाचे आयोजन करतात. या योजनेंतर्गत शाळेमध्ये निबंध स्पर्धा, वत्कृत्व स्पर्धा, परिसंवाद इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. तसेच किशोरवयीन मुला-मुलींना त्यांच्या आरोग्याविषयी जागृती निर्माण करण्यासाठी विविध प्रकारचे मेळावे घेण्यात येतात.

किशोर अवस्थेतील मुलींमध्ये शारिरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक बदल होत असतात. यामध्ये मुख्यतः मासिक पाळी सुरु या महत्त्वाच्या टप्प्याचा समावेश आहे. मासिक पाळी सुरू होण्याचे वय १० ते १६ वर्षांपर्यंत असू शकते. मासिक पाळीविषयी, मासिक पाळीमधील स्वच्छतेविषयक घ्यावयाच्या दक्षतेबाबत असलेल्या अज्ञानामुळे किशोरवयीन मुलींना आरोग्यविषयक विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. यासाठी केंद्र शासनाने सूचित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार मासिक पाळीच्या वेळेस घ्यावयाच्या काळजीबाबत विशेष कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

**उद्देश-**ग्रामीण भागातील किशोरवयीन मुलींमध्ये मासिक पाळीमध्ये स्वच्छतेविषयक घ्यावयाच्या काळजीबाबत जनजागृती करणे, ग्रामीण भागातील किशोरवयीन मुलींना अत्यल्प दरात सॅनिटरी नॅपकीन गावपातळीवर 'आशा' मार्फत उपलब्ध करुन देणे, सॅनिटरी नॅपकीनच्या वापरानंतर योग्य पद्धतीने त्याची विल्हेवाट लावणे.

**विकली आयर्न फॉलिक ॲसिड सप्लिमेंन्टेशन योजना :** राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत मातामृत्यू बालमृत्यू व अर्भक मृत्यू कमी करण्याच्या दृष्टीने राज्यात विविध स्तरावर अथक प्रयत्न करण्यात येत आहेत. राज्यातील एकूण लोकसंख्येच्या २३ टक्के लोकसंख्या किशोरवयीन मुला-मुलींची आहे. राज्यात किशोरवयीन वयोगटातील मुला-मुलींच्या शारीरिक व बौध्दिक वाढीसाठी त्यांचे पोषण होणे आवश्यक आहे. यास्तव सन २०१२-१३ वर्षापासून राज्याने डब्लू.आय.एफ.एस योजना कार्यान्वित केली आहे.

या योजनेंतर्गत महिन्याच्या दर सोमवारी इयत्ता ६ वी ते १२ मधील मुला-मुलींना तसेच शाळेत न जाणाऱ्या मुलींना महिन्याच्या दर सोमवारी लोह व फॉलिक ॲसिडची १ गोळी असे ५२ आठवडे एका वर्षात देण्यात येतात आहे. या कार्यक्रमांमध्ये शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, महिला व बालविकास विभागांचा समावेश आहे. तसेच राज्यात किशोरवयीन वयोगटातील मुला-मुलींमधील थैी Infestation टाळण्यासाठी त्यांना जंतनाशक गोळ्या (Tab -Ibendazole) देण्यात येणार आहेत. या योजनेंतर्गत राज्यातील शाळेत जाणाऱ्या किशोरवयीन मुला-मुलीना व शाळेत न जाणाऱ्या मुलीना वर्षातून दोन वेळा (ऑगस्ट व फेब्रुवारी महिन्यामध्ये) जंतनाशक गोळ्या वाटप मोहीम राबविण्यात येत आहे.

**राष्ट्रीय किशोर स्वास्थ कार्यक्रम-** किशोरवयीन मुलांमुलींसाठी प्रभावी संवाद, क्षमता व देखरेख आणि मूल्यमापनासाठी भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्रालयाने किशोरवयीन आरोग्यासाठी राष्ट्रीय किशोर स्वास्थ कार्यक्रम हा नवीन कार्यक्रम सुरु केला आहे.

**कार्यक्रमाची मुख्य उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत-**पौगंडावस्थेतील मुला-मुलींमधील कुपोषणाचे प्रमाण कमी करणे, लोहाचे प्रमाण कमी झाल्यामुळे होणाऱ्या रक्तक्षयाचे प्रमाण कमी करणे, लैंगिक पुनरुत्पादन संबंधी ज्ञान, दृष्टीकोन व वर्तन सुधारणा करणे, किशोरवयीन वयात गर्भधारणा कमी करणे, प्रसूतीपूर्व व पालकत्व सहाय्यबाबत समुपदेशनाद्वारे सुधारणा, किशोरवयीन मानसिक आरोग्याची समस्या संबोधित करणे, किशोरवयात आपापसात जखम व हिंसा प्रतिबंधित करण्यासाठी अनुकूल दृष्टीकोन प्रवृत्त करणे, मादक पदार्थांच्या अनिष्ट परिणामाबाबत जागरुकता किशोरवयात वाढविणे, मानसिक ताण, रक्तदाब, मधुमेह यांसारखे आजार टाळण्यासाठी पौगंडावस्थेतील बदलाबद्दल प्रोत्साहन देणे.

राष्ट्रीय किशोर स्वास्थ कार्यक्रमांतर्गत पीअर एज्युकेटरची गावपातळीवरील कार्य, किशोरवयीन आरोग्य दिवस साजरा करणे, वर्तणूक बदल संवाद व माहिती शिक्षण संवाद बाबत कार्य हे उपक्रम राबविण्यात येतात.

या लेखांविषयी आपल्या प्रतिक्रिया व अभिप्राय arogyapatrikamh@gmail.com या ई-मेलवर तसेच पत्रव्यवहारासाठी मुख्य संपादक, महाराष्ट्र आरोग्य पत्रिका तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, परिवर्तन, आरोग्य भवन परिसर, विश्रांतवाडी पोलीस स्टेशनसमोर, येरवडा, पुणे-४११००६ येथे संपर्क साधावा.


**-मनोज शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**रायगड-अलिबाग**



## बदलते तंत्रज्ञान

# कॉल ड्रॉप आणि इंटरनेटच्या स्लो स्पीडपासून होणार सुटका

तुम्ही कॉल ड्रॉप किंवा स्लो इंटरनेट स्पीड समस्येचा सामना करत असाल तर आता तुम्हाला याबद्दल काळजी करण्याची गरज नाही. कॉल ड्रॉप आणि स्लो इंटरनेट डेटा स्पीडबाबत सरकार मोठे पाऊल उचलण्याच्या तयारीत आहे.



सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, टेलिकॉम डिपार्टमेंट यावर कारवाई करणार आहे.

सरकार लवकरच टेलिकॉम कंपन्यांना सेवेची क्वालिटी सुधारण्याच्या सूचना देणार आहे. यासाठी टेलिकॉम सचिवांनी २८ डिसेंबरला टेलिकॉम कंपन्यांसोबत बैठकही बोलावली आहे. या बैठकीत यासंदर्भात मोठा निर्णय घेतला जाणार आहे. अनेकदा युजर्स मध्येच कॉल डिस्कनेक्ट झाल्याची तक्रार करतात. याशिवाय, इंटरनेटचा स्लो स्पीड युजर्सचा मूड खराब होतो. युजर्सची ही समस्या सोडवण्यासाठी टेलिकॉम डिपार्टमेंट ॲक्टिव्ह मोडमध्ये आले आहे. त्यामुळे येत्या काळात या समस्येतून सुटका करण्यासाठी सरकार नवीन नियम जारी करू शकते.

टेलिकॉम डिपार्टमेंट भारतीय टेलिकॉम सेक्टरमधील सर्व कंपन्यांना सेवा सुधारण्यासाठी सूचना देईल. यासंदर्भात टेलिकॉम सचिवांनी टेलिकॉम कंपन्यांसोबत बैठक बोलावली आहे. २८ डिसेंबर रोजी होणाऱ्या या बैठकीत टेलिकॉम कंपन्यांचे टॉप अधिकारीही सहभागी होणार आहेत. या बैठकीत कॉल ड्रॉप आणि स्लो इंटरनेट स्पीडबाबत मोठा निर्णय घेतला जाऊ शकतो. अशा परिस्थितीत सरकार युजर्सच्या हितासाठी काही मोठे पाऊल उचलू शकते, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.

### अचानक सेवेच्या क्वालिटीवर परिणाम का?

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ५जीसुरू झाल्याने टेलिकॉम सेवेच्या क्वालिटीवर परिणाम झाला आहे. टेलिकॉम कंपन्यांच्या सेवेच्या क्वालिटीवर सरकार खूश नाही. या प्रकरणी टेलिकॉम विभागाने ट्रायला पत्र लिहिले आहे. टेलिकॉम डिपार्टमेंटने ट्रायकडे सेवांचे नियम कडक करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून सेवा सुधारून युजर्सना फायदा मिळू शकेल.

### देशात ११५ कोटी ग्राहक

कॉल ड्रॉप आणि इंटरनेटचा स्पीड कमी असल्याने टेलिकॉम सेवेची स्थिती चांगली नाही. ट्राय आणि टेलिकॉम कंपन्या यांनी सोबत मिळून तोडगा काढावा, अशी सरकारची इच्छा आहे. दरम्यान, देशात ११५ कोटी ग्राहक आहेत, परंतु ग्राहकांच्या तुलनेत पायाभूत सुविधा कमकुवत आहेत.

# भारतातील एक यशस्वी उद्योजक रतन टाटा



## निमित्त

आधुनिक भारताच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, औद्योगिक जडणघडणीत अनेकांचा मोठा वाटा आहे. राजकीय नेत्यांचा जसा देशाला दिशा देण्याचा वाटा महत्त्वाचा तसाच उद्योग उभारून देशाचं आर्थिक चाक मजबूत करणाऱ्या उद्योगपतींचा वाटाही तितकाच मोठा असतो. पण अनेकदा आपल्याला राजकीय व्यक्तिमत्त्वांबद्दल माहिती असते तितकी माहिती उद्योगपती, शास्त्रज्ञ, शिक्षक यांच्याबद्दल नसते. महान उदयोगपती जमशेदजी टाटा हे असेच एक उद्योगपती. टाटा ग्रुपच्या अनेक कंपन्यांनी देशाच्या आर्थिक उभारणी मोलाचं योगदान दिलं आहे. जमशेदजींची परंपरा त्यांच्या पुढच्या पिढीनेही जपली, चालवली आणि वृद्धिंगत केली. जमशेदजींचे दत्तक नातू नवल टाटा यांचा मुलगा उद्योगपती रतन टाटा यांचंही नाव यात अग्रक्रमाने येतं. रतन टाटा यांचा आज वाढदिवस आहे. यानिमित्त रतन टाटांबद्दल जाणून घेऊया.

सुप्रसिद्ध उद्योगपती रतन टाटा २८ डिसेंबर १९३७ रोजी मुंबईत झाला. टाटा सन्सचे माजी अध्यक्ष रतन टाटा यांनी विविध धोरणं अवलंबून वाढवलेला व्यवसाय आणि त्यांची परोपकारी वृत्ती यासाठी ते भारतातील सर्वांना परिचित आहेत. त्यांचं प्राथमिक शिक्षण मुंबईत झालं पण १९५५ मध्ये त्यांनी न्यूयॉर्क सिटीतील रिव्हरडेल कंट्री स्कूलमधून पदवी घेतली. सन १९५९ मध्ये न्यूयॉर्कमधील कॉर्नेल विद्यापीठातून त्यांनी आर्किटेक्चरची पदवी घेतली.

रतन टाटांनी १९६२ मध्ये टाटा ग्रुपमधून करिअर सुरू केलं. तेव्हा त्यांचं वय फक्त २४ होतं. पहिल्यांदा त्यांनी टाटा स्टीलच्या एका दुकानात कर्मचारी म्हणून काम केलं. जेआरडी टाटांनंतर १९९१ मध्ये रतन टाटा समूहाचे पाचवे अध्यक्ष झाले. त्यांच्या कारकीर्दित टाटा ग्रुपने टेटली, जग्वार लँड रोव्हर आणि कोरससारख्या कंपन्या विकत घेतल्या. भारतातील सामान्य माणसाची इच्छा रतन टाटा व्यवस्थित जाणत होते. सामान्य माणसाला कुटंबासोबत जायला एक कार असावी हे त्याचं स्वप्न रतन टाटा यांनी साकार केलं. नॅनो ही सामान्य माणसाला परवडेल अशी कार तयार करून बाजारात आणण्यात काम त्यांनीच केलं. एक लाख रुपयांत ही कार तेव्हा मिळत होती त्यामुळे अगदी मध्यमवर्गीयांच्या दारातही चारचाकी गाडी उभी राहिली. इंडिका ही कारही रतन यांच्याच कल्पनेतून तयार झाली.

रतन यांचं टाटा कुटुंबाशी रक्ताचं नातं नाही. नवल टाटा आणि त्यांच्या पत्नी नवजबाई सेठ यांचे दत्तकपुत्र म्हणजे रतन टाटा. रतन लहान असतानाच त्यांचे आई-वडिल विभक्त झाले. रतन यांचं आईवर खूप प्रेम होतं. रतन टाटा जेव्हा कंपनीत रुजू झाले तेव्हा टाटा कंपनीची एकूण उलाढाल १०००० कोटी रुपये होती. २०११-१२ या वर्षात टाटा कंपनीचा महसूल ४७५.७२१ कोटी रुपये झाला होता. आज जवळजवळ ८० देशांत सध्या टाटा ग्रुपच्या कंपन्या आहेत. कंपनीसाठी जे चांगलं आहे आणि जगासाठीही हिताचं आहे तेच करायचं असं रतन टाटांचं कायम धोरण होतं. त्यांनी भारतात प्रसिद्ध असलेले विकसित देशांतील ब्रँडही विकत घेतले.

कंपनी, व्यवसायाबरोबरच समाजाच्या हिताचा सतत विचार करणं ही टाटा समूहाची खासियत आहे. ती खासियत राखत रतन टाटा यांनी २१ वर्षांच्या करिअरमध्ये टाटा उद्योग समूहाला एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवलं. औद्योगिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेतल भारत सरकारने २००० मध्ये त्यांना पद्मभूषण आणि २००८ मध्ये पद्मविभूषण पुरस्कार देऊन गौरवलं.


जगभरातील कंपन्यांचे व्यवहार सांभाळणारे हे टाटा समूहाचे अध्यक्ष रतन टाटा एक कुटुंबप्रमुख म्हणूनही लोकांच्या कायम स्मरणात राहिले.रतन टाटा यांनी टाटा उद्योग समूहाला नवी दिशा दिली. त्याचबरोबर फिलांथ्रोपिस्ट म्हणूनही ते प्रसिद्ध आहेत. शिक्षण, आरोग्य आणि ग्रामविकासाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक संस्थांना टाटांनी मदत केली आहे. व्यवसाय आणि परोपकाराच्या क्षेत्रातील त्यांच्या योगदानासाठी त्यांना अनेक पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं आहे. त्यांना उदंड आयुष्य लाभो याच त्यांना वाढदिवसाच्या मनापासून शुभेच्छा.

**-क्रांती कानेटकर**

## क्लिक...क्लिक...!



**सिंधुदुर्ग : सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे स्वागत करण्यासाठी नाताळच्या सुटीपासूनच पर्यटक समुद्रकिनारी गर्दी करू लागले आहेत. मालवण येथील चिवला बीचवर आईसोबत समुद्राकडे कुतुहलाने पाहणारी चिमुकली टिपली आहे दिलीप रेडकर यांनी.**



## आरोग्य प्रहर



# जेवताना मध्येच पाणी पिणे आरोग्यासाठी नुकसानकारक

बऱ्याच लोकांना काही खाताना किंवा जेवताना मध्येच किंवा जेवणानंतर लगेच पाणी पिण्यची सवय असते. मात्र याच सवयीमुळे अनेक त्रास होऊ शकता. तुम्हालाही अशी सवय असेल यामुळे काय नुकसान होते, हे जाणून घेऊया.

**पचन क्रियेवर पडतो प्रभाव** – जेवताना किंवा नंतर लगेच पाणी प्यायल्याने पचनावर परिणाम होतो. खरे तर आपण जेव्हा अन्न खातो, तेव्हाच पचनक्रिया सुरू होते. अशा परिस्थितीत जेवणाच्या मध्येच पाणी प्यायल्याने या प्रक्रियेत अडथळा निर्माण होतो. ज्यामुळे एकतर अन्न पचायला बराच वेळ लागतो किंवा कधीकधी अन्न नीट पचत नाही.

**वाढू शकते इन्सुलिनची पातळी** – शरीरातील इन्सुलिन नावाचे हार्मोन स्वादुपिंडाद्वारे सोडले जाते. शरीरातील साखरेच्या प्रवाहात इन्सुलिनची महत्त्वाची भूमिका असते. पण जेवताना किंवा नंतर लगेच पाणी प्यायल्याने शरीरात इन्सुलिनचे प्रमाण वाढण्याची शक्यता वाढते, ज्यामुळे मधुमेहाचा धोका वाढतो.

**सिड रिफ्लेक्सचा त्रास होऊ शकतो** – अन्नासोबतच पाणी प्यायल्याने सिड रिफ्लेक्सची समस्या देखील उद्भवू शकते. सोप्या भाषेत सांगायचे झाले तर, अन्न खाताना पाणी प्यायल्याने पोटात सिडचे प्रमाण वाढते, त्यामुळे अनेक वेळा आंबट ढेकर येऊ लागतात. या समस्येलाच सिड रिफ्लेक्स म्हणतात. एवढेच नाही तर जेवताना पाणी प्यायल्याने छातीत जळजळ होऊ शकते.

**वाढू शकते वजन** – जेवता पाणी प्यायल्याने लठ्ठपणाचाही धोका संभवतो. खरंतर जेवताना पाणी प्यायल्याने पचनावर परिणाम होतो. अशा परिस्थितीत अन्नाचे पचन नीट होत नाही, आणि जे अन्न पचत नाही त्यापासून तयार होणारे ग्लुकोज लठ्ठपणात बदलते. जेवताना किंवा त्यानंतर लगेच पाणी प्यायल्याने तुमच्या शरीरातील साखर तर वाढतेच पण वजनातही वाढ होऊ शकते.

**पोषक तत्वांची कमतरता** – जर तुम्हालाही जेवताना पाणी पिण्याची सवय असेल तर शरीरात पोषक तत्वांची कमतरता निर्माण होऊ शकते. अन्नातील पोषक तत्व शोषून घेणे हे आपल्या पचनसंस्थेचे काम असते. पण जेवताना मध्येच पाणी प्यायल्यास या प्रक्रियेत अडथळा निर्माण होतो, त्यामुळे आपल्या शरीरात पोषक तत्वांचा पुरवठा योग्य प्रकारे होत नाही.

# खोपोली शहरातील नागरी समस्या सोडवा

## भाजपचा आक्रमक पवित्रा; मुख्याधिकाऱ्यांना निवेदन


(छाया : जयवंत माडपे)

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहरातील विविध नागरी समस्यांबाबत भारतीय जनता पक्ष शहर आक्रमक झाली असून, शहराध्यक्ष इंदरमल खंडेलवाल यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकाऱ्यांनी मुख्याधिकारी अनुप दुरे यांना निवेदन देण्यात आले. या समस्या तातडीने सोडविण्याची मागणीही या वेळी करण्यात आली.

शहरातील पाणी समस्या, स्वच्छता, बंद नाट्यगृह, उद्यानांची दुर्दशा, मुख्य रस्त्यांवर होणारी वाहतूक कोंडी, रस्त्यांवर अनेक भागात होणाऱ्या टपऱ्यांचे अतिक्रमण, त्याचप्रमाणे विविध प्रभागातील पार्किंग समस्या, या विविध समस्यांवर चर्चा होऊन त्या तातडीने सोडविण्याचे आश्वासन मुख्याधिकारी अनुप दुरे यांनी दिले.

या वेळी खोपोली भाजप अध्यक्ष इंदरमल खंडेलवाल, सरचिटणीस हेमंत नांदे, प्रमोद पिंगळे, उपाध्यक्ष रमेश रेटरेकर, उत्तर रायगड जिल्हा वैद्यकिय सेल अध्यक्ष डॉ. नागरगोजे, चिटणीस सुमिता महर्षि, महिला आघाडी सरचिटणीस अश्विनी अत्रे, मीडिया सेल राहुल जाधव, सचिन मोरे, शक्ति प्रमुख संजय म्हात्रे, देवेंद्र पाटिल, जिल्हा सदस्य स्नेहल सावंत, अपर्णा साठे, वैद्यकीय सेलसह संयोजक विकास नाईक, माथाडी कामगार अध्यक्ष राम पवार, कीर्ति ओसवाल, सुरेन जाधव, बूथ अध्यक्ष नीलेश ओसवाल, गिरीष अभाणी आदी उपस्थित होते.

# गडब माचेलाच्या शेतकऱ्यांचे आत्मदहन स्थगित

**पेण : प्रतिनिधी**

गडब माचेला येथील नैसर्गिक नाल्यावर जेएसडब्ल्यू कंपनीने पाईप टाकून पाण्याचा मार्ग बंद केला होता. यामुळे मच्छिमार शेतकऱ्यांचा येण्या–जाण्याचा मार्ग बंद झाल्याने २६ डिसेंबर रोजी पेण प्रांत कार्यालयासमोर आत्मदहन करणार असल्याचा बापदेव शेतकरी मंडळाचे अध्यक्ष सुनिल कोठेकर यांनी लेखी अर्ज दिला होता. पेण खारभूमी खात्याचे अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर शेतकऱ्यांनी आत्मदहन स्थगित केले.

शेतकऱ्यांनी आत्मदहन केल्यास परिस्थिती गंभीर होऊ शकते. यामुळे प्रशासनाने पोलीस बंदोबस्त, अग्निशमन दलाच्या गाड्या प्रांत कार्यालयात हजर ठेवल्या होत्या. पेण खारभूमीचे अधिकारी सुरेश सावंत यांनी, गडब माचेला हद्दीतील उघाडीवर जाऊन कंपनीने टाकलेले पाईप मशिनरीच्या सहाय्याने काढण्यासाठी पाहणी केली, मात्र जेसीबी, हायड्रा, मशिनरी तूर्त उपलब्ध नसल्याने पुढील १५ दिवसांत टाकलेले पाईप काढून त्या भरावयाच्या खाली सिमेंटचे ब्रिज बांधून नाल्याचे पाणी जाण्याचा मार्ग सूरळित केला जाईल, असे सांगितले. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला आत्मदहनाचा निर्णय मागे घेतला.

# सुषमा अंधारेंवर गुन्हा दाखल करण्याची वारकरी संप्रदायाची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

हिंदू देवतांबद्दल अपशब्द वापरणाऱ्या शिवसेना ठाकरेगटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांच्यावर गुन्हा दाखल करावा, अशा मागणीचे निवेदन वारकरी साहित्य परिषदेच्या वतीने मंगळवारी (दि. २७) खोपोली पोलीस ठाण्यात देण्यात आले.

वारकरी संप्रदायाला थोर परंपरा असून, सुषमा अंधारे खिल्ली उडवण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्याबद्दल समस्त वारकरी संप्रदायाच्या भावना दुखावल्या आहेत. हिंदू देवतांवर तसेच संत महात्म्यांवर अपमानास्पद वक्तव्य करण्याचा त्यांना कोणताही अधिकार नाही. त्यांनी केलेल्या वक्तव्याचा आम्ही समस्त वारकरी समाज निषेध करीत आहोत, तसेच त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करून गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे संघटनेचे कोकण प्रांत अध्यक्ष हभप कृष्णा महाराज लांबे यांनी केली आहे.

खोपोली पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांनी ते निवेदन स्वीकारले. जर पोलिसांनी गुन्हा दाखल केला नाही, तर आम्ही आमच्या संघटनेतर्फे त्यांच्यावर खटला दाखल करणार असल्याचा इशाराही संघटनेने दिला आहे.



# महाआरोग्य मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद; शेकडो ग्रामस्थांची तपासणी

**कर्जत : प्रतिनिधी**

कोकण विभाग पत्रकार संघाने आयोजित केलेल्या महाआरोग्य शिबिरात ५००हून अधिक रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यातील २०० रुग्णांना चष्मे वाटप करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन संघटनेचे जिल्हाध्यक्ष दीपक बोराडे, पाथरजच्या सरपंच जोत्स्ना घोडविंदे, राधामीरा ट्रस्टचे व्यवस्थापक रंजन पिल्लई, महेश आगे, ग्रामसेवक बाळकृष्ण मोरे, महाराष्ट्र एकीकरण समितीचे कल्याण डोंबिवली अध्यक्ष गणेश तिखंडे, अभिनेत्री ममता जितवानी, अंकुश घोडविंदे, डोंगरपाडा आश्रमशाळेचे प्राचार्य रमेश चव्हाण, दिव्यांग गिर्यारोहक जनार्धन पानमंद, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष शरद तवळे, सह्याद्री आदिवासी सामाजिक संस्थेचे अध्यक्ष कांता पादिर, मंगल केवारी, अश्विन पादिर, सीताराम केवारी आदी उपस्थित होते.



स्त्रीरोग चिकित्सक डॉ. भगवान कराळे, डॉ. निलेश यादव, डॉ. साजुका काठे, हृदयरोग तज्ज्ञ डॉ. संजीवदास राव, दंतचिकित्सा डॉ. गणेश मेंगाल यांनी तपासणी केली. युनिकोन सिक्युरिटीकडून २५ बेरोजगार तरुणांची रोजगार नोंदणी केली.

# सुधागडात श्रमसंस्कार शिबिरातून विद्यार्थ्यांनी गावचे रूप पालटले



(छाया : धम्मशील सावंत)

## प्रबोधन व जनजागृती

**विद्यार्थ्यांनी पथनाट्य, नाटुकली आणि नृत्याविष्काराच्या माध्यमातून गावकऱ्यांमध्ये जलसंवर्धन, अंधश्रद्धा निर्मूलन, पर्यावरण संवर्धन, वैज्ञानिक दृष्टिकोन, स्त्री–पुरुष समानता, आहार–विहार आणि योग प्राणायाम, उच्च शिक्षण, मराठी शाळांचे महत्त्व इत्यादी सामाजिक प्रश्नांप्रती जनजागृती व प्रबोधन केले. विविध विषयांवरील मार्गदर्शक व्याख्याने, संध्याकाळी ग्रामसर्वेक्षण आणि सांस्कृतिक कार्यक्रम राबवण्यात आले.**

**पाली : प्रतिनिधी**

तरुणांचा ध्यास गाव शहराचा विकास या संकल्पनेवर आधारित राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत पालीतील शेठ जे. नौ. पालीवाला महाविद्यालयाचे सात दिवसीय निवासी श्रमसंस्कार शिबीर भार्जे येथे झाले. या शिबिरात बंधारा बांधून तसेच विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांनी गावचे रूप पालटले आहे.

शिबिराचे उद्घाटन सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह गीता पालरेच्या यांच्या हस्ते करण्यात आले, तर समारोप उपाध्यक्ष रवींद्र लिमये यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या सात दिवसांत विद्यार्थ्यांनी श्रमदानातून गावातील कानाकोपऱ्याची स्वच्छता केली. डिसेंबरमध्ये आटत असलेल्या भार्जे येथील नदीचे पाणी विद्यार्थ्यांनी वनराई बंधारा बांधून अडवले. परिणामी बंधाऱ्यामुळे नदी पात्रात मोठ्या प्रमाणात पाणी साठले आहे आणि त्यामुळे भूजल स्तर वाढण्यास मदत झाली आहे.

शिबिरादरम्यान सरपंच अनुसया पवार, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष माधुरी जाधव, उपाध्यक्ष व सर्व सदस्य, पोलीस पाटील जाधव, राजिप. शाळेचे मुख्याध्यापक कैलास म्हात्रे, शिक्षकवृंद, सुधागड एज्युकेशन सोसायटीचे संचालक रमेश साळुंखे, चंद्रकांत गोफन, रामदास चव्हाण, गणपती चव्हाण आदींसह सर्व ग्रामस्थांचे बहुमोलाचे सहकार्य लाभले. योगा प्राणायामसाठी सुधागड गटविकास अधिकारी अशोक महामुनी यांचे विशेष सहकार्य लाभले.

शिबिर यशस्वी करण्यासाठी पालीवाला महाविद्यालयाचे विद्यार्थी तसेच सुधागड एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव रविकांत घोसाळकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधाकर लहूपचांग, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. स्नेहल बेलवलकर, प्रा. ज्ञानेश्वर मुंढे, प्रा. राकेश शिर्के, प्रा. संतोष भोईर, मारुती शिंदे, सर्व स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले.

> **श्रमसंस्कार शिबिरातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास होतो. नेतृत्व गुण वाढीस लागतात, एक चांगला वक्ता तयार होतो. समाज सेवक, आदर्श नागरिक निर्माण होतो आणि स्वतःची कामे स्वतः करण्याची सवय लागते.**
>
> **–प्रा. स्नेहल बेलवलकर, कार्यक्रमाधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना**

## सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पनवेल तालुका यांचे समोर

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पहिला मजला कृषी उत्पन्न बाजार समिती, सहकार मार्ग, रायगड बाजाराच्या बाजूला पनवेल जि. रायगड ४१०२०६**

**महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली दाखल दावा नोटीस**

कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल ता. पनवेल जि. रायगड या संस्थेने या कार्यालयाकडे महाराष्ट्र सहकारी कायदा अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये खालील व्यक्तीं विरुद थकीत कर्जाचा भरणा केला नसल्याचे नमुद करून वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे..

त्यानुसार या कार्यालयात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली, तथापी खालील नमुद व्यक्तींना सुनावणी नोटीसची पोहोच होत नसल्याने नैसर्गिक न्याय तत्वानुसार म्हणने दाखल करण्यासाठी जाहीर नोटीस देण्यात येत आहे या जाहीर नोटीस द्वारे आपणास पुन्हा एक संधी देण्यात येत असून सदर दाव्याबाबत अंतीम सुनावणी ०९/०१/२०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता ठेवण्यात आली असून सदर सुनावणीस आपण स्वतः वा आपले प्रतिनिधी मार्फत उपस्थीत राहावे आपण गैरहजर राहिल्यास आपल्या अनुपस्थीतीत दाव्याचा निकाल केला जाईल व नंतर आपले कोणतेही म्हणने ऐकून घेतले जाणार नाही.

**वैयक्तिक कर्ज**

| अ.क्र. | दावा क्रमांक | कर्जदार/जामिनदार | पत्ता | थकीत कर्ज |
|---|---|---|---|---|
| १ | ६१/२०२२–२३ | श्रीमती संदिका संदेश वाजे (कर्जदार) | रूम नं. ७०२, सिल्वर केस्ट, प्लॉट नं. २९. सेक्टर– २५, खांदेश्वर स्टेशन समोर, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड. ४१० २०९ | |
| | | श्री. सचिन घोंडू चाचे (जामिनदार) | बालाजी अपार्टमेंट, अे–विंग, रूम नं. ४०२, कल्पवृक्ष रोड, हेदुताने वलप, तळोजा, ता–पनवेल ता–पनवेल, जि– रायगड. ४१०२१६ | ७६,६२७/– |
| | | श्री. निलेश काशिनाथ गायकर (जामिनदार) | रा. रूम नं. ३०१, ओमकार रॉयल रेसीडेंन्सी, आकुर्ली, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. ४१० २०६ | |
| २ | ६२/२०२२–२३ | श्री. मिलिंद मोहन शिलवंत (कर्जदार) | रा. अे–३०१, कावेरी को. ऑप. हौ. सोसायटी, एम.एस.एस. प्लॉट नं. ४, सेक्टर–५, खारघर, नवी मुंबई, रिजन्सी पार्क ४१० २१० | |
| | | श्री. नामदेव वसंत कोडग (जामिनदार) | रा. अे–२०२, शुभमंगळ को. ऑप. हौ. सोसायटी, प्लॉट नं. ५८, सेक्टर–३४, कामोठे, ता–पनवेल, जि – रायगड. ४१०२०९ | २३,७२४/– |
| | | श्री. चंद्रकांत रामचंद्र बगाडे (जामिनदार) | बी–२ ०७, कावेरी को. ऑप. हौ. सोसायटी, प्लॉट नं. ८/४१, आसुडगाव, खांदा कॉलनी, ता. पनवेल, जि. रायगड. ४१० २०६ | |
| ३ | ६३/२०२२–२३ | श्री. धर्मेंद्र दिनेश परदेशी (कर्जदार) | रूम नं. २, मौजे चिंचपाडा, ता. पनवेल, जि. रायगड. ४१० २०६ | |
| | | श्री. निकेश काळूराम पार्थी (जामिनदार) | हरीग्राम, पो– मोर्बे, मराठी शाळेजवळ, ता–पनवेल, जि– रायगड. ४१०२१६ | ६५,९०३/– |
| | | श्री. बाळू पांडू वाघ (जामिनदार) | वाघाची वाडी, पो– वाजे, ता. पनवेल, जि. रायगड. ४१० २०६ | |
| ४ | ६४/२०२२–२३ | श्री. राहुल जयवंत कदम (कर्जदार) | ई १४७०, वृंदावन लॉजच्या बाजूला, लाईन आळी, म्हात्रे हॉस्पिटलच्या बाजूला, शिवाजी रोड, ता–पनवेल, जि– रायगड. ४१० २०६ | |
| | | श्री. अशोक जयशंकर रावल (जामिनदार) | ब्लॉक नं. डी/८, सहयोग नगर, पनवेल, ता.पनवेल, जि. रायगड. ४१० २०६ | ४६,१३५/– |
| | | श्री. दिलीप गणू भोमकर (जामिनदार) | पहिला मजला, रूम नं. ६, उमाशंकर अपार्टमेंट, ओल्ड पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. ४१० २०६ | |
| ५ | ६५/२०२२–२३ | श्री. मनोज रामपाल पिव्हल (कर्जदार) | आदिवासी वाडी, ग्रामपंचायत जवळ, सेक्टर– १. कळंबोली, ता.पनवेल, जि. रायगड. ४९० २१८ | |
| | | श्रीमती सोनिया सुखपाल सोदे (जामिनदार) | एल. आय. जी–१, रूम नं १, सेक्टर–३, कळंबोली, ता–पनवेल, जि– रायगड. ४१०२१८ | ६३,७४९/– |
| | | श्रीमती रविता रविंद्र कुरंगली (जामिनदार) | घर नं. १२०, मु.पो. सोमटणे, ता. पनवेल, जि. रायगड. ४१० २०६ | |
| ६ | ६६/२०२२–२३ | श्रीमती सोनिया सुखपाल सोदे (कर्जदार) | रा. एल. आय. जी–१, रूम नं– एम / १, सेक्टर–३, कळंबोली, ता–पनवेल, जि– रायगड. ४१०२१८ | |
| | | श्री. मनोज रामपाल पिव्हल (जामिनदार) | आदिवासी वाडी, ग्रामपंचायत जवळ, सेक्टर–१, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड. ४१० २१८ | ६१,३४४/– |
| | | श्रीमती रविता रविंद्र कुरंगली (जामिनदार) | घर नं. १२०, मु.पो.सोमटणे, ता. पनवेल, जि. रायगड. ४१० २०६ | |

सदरची नोटीस माझे सही शिक्यानिशी दिली आहे,
स्थळ – पनवेल
दिनांक – २६/१२/२०२२
जावक क्रमांक, २६४४/२०२२–२३

शिक्का

**सही/–**
**सहायक निबंधक**
**सहकारी संस्था, पनवेल, जि. रायगड**

# सासवणे येथे माणुसकी प्रतिष्ठानच्या शाखेचे उद्घाटन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

माणुसकी प्रतिष्ठानच्या सासवणे येथील शाखेचे रविवारी (दि. २५) उत्साहात उद्घाटन झाले.



या वेळी माणुसकी प्रतिष्ठान महाराष्ट्र, लायन्स क्लब मांडवा तसेच लायन्स हेल्थ क्लब फाउंडेशन अलिबाग यांच्या सहयोगाने मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. यामध्ये सुमारे १५० रुग्णांनी सहभाग घेतला. मुख्य अतिथी म्हणून सासवणेचे सरपंच संतोष गावंड, माजी सरपंच सुष्मीता घरत, अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. राहुल शर्मा, माणुसकी प्रतिष्ठान महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान, डॉ. शाहिदा अन्सारी, डॉ. प्रज्योत पाटील, डॉ. कुडतलकर व टीम, माणुसकी प्रतिष्ठान अलिबाग अध्यक्ष ॲड. भूषण जंजिरकर, खंडाळा अध्यक्ष उज्वला चंदनशिव लायन्स क्लब मांडवा सेक्रेटरी सुमित पाटील व टीम उपस्थित होती.

माणुसकी प्रतिष्ठान सासवणे अध्यक्ष अश्विनी वर्तक यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. सदस्य धर्मेंद्र वर्तक यांनी सूत्रसंचालन केले.


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM RE–TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification:

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:** EE/EHV (O&M)/DN/MHD/RE-Tender-52/2022-23 Dt. 28.12.2022 **RFx No. 7000025689** | **Sub:** Invitation of SRM RE-Tender for the work of Stub strengthening of towers of various 220 kV / 100 kV EHV line S/Dn. Mahad under EHV (O&M) Dn., Mahad for the year 2022-23 | Up to Rs. 24,99,094/- (Including GST + 1% Labour Cess) |

**EMD** will be 1% of the **Estimated Cost** or Rs. 5,000/- whichever is the higher
**Tender Fee**: Rs. 500/- plus GST + 1% Labour Cess.
**Bid Submission is From:** 28.12.2022 @ 00:00 Hrs to 03.01.2023 @ 23:59 Hrs for above tender. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 7373101089
**Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer (I/c)**
**EHV (O&M) Dn., Mahad**



महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

क्रमांक: डीआरए-०५२२/प्र.क्र.१८८/२०२२/जाहिरात — दिनांक: २७ डिसेंबर, २०२२

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत खालील संवर्गातील पद भरतीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत:-

| जाहिरात क्रमांक | संवर्ग | एकूण पदसंख्या |
|---|---|---|
| ११७/२०२२ | भिषक (Senior Physician), विशेषज्ञ, महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट-अ | ०८ |
| ११८/२०२२ | शल्यचिकित्सक (Senior Surgeon) विशेषज्ञ, महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट-अ | ०८ |
| ११९/२०२२ | अस्थिव्यंग शल्यचिकित्सक (Senior Orthopaedic Surgeon), विशेषज्ञ, महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट-अ | ०५ |
| १२०/२०२२ | स्त्रीरोग व प्रसुती शास्त्रज्ञ (Senior Obstetrician and Gynaecologist) विशेषज्ञ, महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट-अ | ०७ |
| १२१/२०२२ | बालरोग तज्ञ (Senior Paediatrician) विशेषज्ञ, महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट-अ | ०५ |
| १२२/२०२२ | नेत्ररोग तज्ञ, (Senior Ophthalmologist) विशेषज्ञ, महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट-अ | ०५ |
| १२३/२०२२ | क्ष-किरण शास्त्रज्ञ (Senior Radiologist) विशेषज्ञ, महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट-अ | ०३ |
| १२४/२०२२ | बधिरीकरण शास्त्रज्ञ (Senior Anaesthetist) विशेषज्ञ, महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट-अ | ०५ |
| १२५/२०२२ | शरीरविकृती शास्त्रज्ञ (Senior Pathologist) विशेषज्ञ, महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट-अ | ०३ |
| १२६/२०२२ | मनोविकार तज्ञ (Senior Psychiatrist) विशेषज्ञ, महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट-अ | ०१ |
| १२७/२०२२ | कान, नाक घसा तज्ञ (Senior E.N.T. Surgeon) विशेषज्ञ, महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट-अ | ०२ |
| १२८/२०२२ | प्रशासन अधिकारी, महाराष्ट्र राज्य विमा सेवा, गट-ब | १५ |

२. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरावयाच्या पदांचा संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, प्रवर्गनिहाय तपशील, आवश्यक अर्हता, वयोमर्यादा, आरक्षण, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे तसेच सविस्तर जाहिरातीचे कृपया अवलोकन करावे.

३. ऑनलाईन अर्ज https://mpsconline.gov.in या संकेतस्थळाद्वारे दिनांक ३० डिसेंबर, २०२२ ते दिनांक १९ जानेवारी, २०२३ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

४. आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

ठिकाण : मुंबई. — सह सचिव (जाहिरात), महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

# गोवर रुबेला लसीकरणाला वेग

## नवी मुंबईमध्ये पहिल्या फेरीत १०,५६८ बालकांना डोस

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका टास्क फोर्सच्या ३० नोव्हेंबर व १३ डिसेंबरच्या विशेष बैठकीत महापालिका आयुक्तांनी मान्यता दिल्यानुसार शासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने नवीन उद्रेक सुरू झाल्यास नऊ महिने ते ते पाच वर्ष वयाच्या बालकांना गोवर रुबेला लसीचा एक अतिरिक्त डोस तसेच सहा महिने ते नऊ महिने वयाच्या बालकांस एमआर लसीचा झिरो डोस देण्याचे निश्चित करून त्याच्या अंमलबजावणीस सुरूवात करण्यात आली होती.



यानुसार १ ते १४ डिसेंबरपर्यंतच्या अतिरिक्त लसीकरण सत्र मोहीमेत उद्रेक कार्यक्षेत्रामध्ये सहा ते नऊ महिने वयोगटातील २४५ बालकांना झिरो डोस तसेच नऊमहिने ते पाच वर्ष वयोगटातील १०,५६८ बालकांना अतिरिक्त डोस देण्यात आलेले आहेत.

याचप्रमाणे शासनाच्या सूचनांप्रमाणे विशेष गोवर रूबेला लसीकरण मोहिमेची पहिली फेरी १५ ते २५ डिसेंबर या कालावधीत अत्यंत सुयोग्य नियोजन केल्याने नवी मुंबई महापालिका क्षेत्रात यशस्वीपणे पार पडली. या विशेष मोहिमेंतर्गत पहिल्या फेरीत २३२ लसीकरण सत्रांचे आयोजन करण्यात आले व एकूण १२४६ बालकांच्या लसीकणाचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला. या २३२ लसीकरण सत्रांमध्ये २५ डिसेंबरपर्यंत ६५९ लाभार्थी बालकांना म्हणजेच उद्दिष्टापेक्षा जास्त १०५ टक्के बालकांना एमआर लसीचा पहिला डोस देण्यात आला. तसेच उद्दिष्टापेक्षा अधिक ६७७ बालकांना म्हणजेच ११० टक्के बालकांना एमआर लसीचा दुसरा डोस देण्यात आला.

शासन निर्देशानुसार १५ ते २५ जानेवारी २०२३ या कालावधीत विशेष गोवर रूबेला लसीकरण मोहिमेची दुसरी फेरी आयोजित करण्यात येत असून त्याचेही सुयोग्य नियोजन करण्यात येत आहे. याविषयी महापालिका आयुक्त (अतिरिक्त कार्यभार) अभिजित बांगर यांनीही नुकताच आढावा घेतला असून उद्रेक क्षेत्रातील अतिरिक्त डोस व झिरो डोस देण्याच्या कार्यवाहीकडे काटेकोर लक्ष देण्याचे निर्देशित केलेले आहे.

# मॉल्समध्ये स्वच्छताविषयक उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**



ख्रिसमसच्या पार्श्वभूमीवर नवीन वस्तू खरेदीचा बाजारपेठांतील उत्साही माहौल लक्षात घेऊन या गर्दीमध्ये स्वच्छता संदेशाचा प्रसार होण्याच्या दृष्टीने नवी मुंबई महापालिका स्वच्छ महाराष्ट्र अभियान कक्षाच्या वतीने वाशी येथील इनॉर्बिट मॉल आणि सीवूड नेरूळ येथील ग्रँड सेंट्रल मॉलमध्ये 'फ्लॅश मॉब' ही अभिनव संकल्पना राबविण्यात आली.

या दोन्ही ठिकाणी मोठ्या संख्येने कुटुंबासह उपस्थित असलेल्या नागरिकांनी फ्लॅश मॉबमधील गीतनृत्यांना उत्तम प्रतिसाद देत यातील शंबरहून अधिक कालाकलाकारांसह 'निश्चय केला, नंबर पहिला' चा गजर केला. यावेळी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त तथा स्वच्छ भारत अभियानाचे नमुंमपा नोडल अधिकारी डॉ. बाबासाहेब राजळे यांनी उपस्थित नागरिकांना कचरा वर्गीकरण व त्याच्या सुयोग्य विल्हेवाट पद्धतीचे तसेच प्लास्टिक पिशव्यांना ठाम नकार देत कापडी पिशव्यांचा वापर वाढविण्याविषयीचे आवाहन केले. यावर्षी 'स्वच्छ सर्वेक्षण २०२३'ला सामोरे जात असताना गतवर्षीचे देशातील तृतीय क्रमांकाचे मानांकन उंचाविण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने जोरदार प्रयत्न सुरू केले असून आयुक्तांच्या मार्गदर्शनानुसार व्यापक लोकसहभाग घेत विविध उपक्रम राबविण्यावर भर दिला जात आहे. याचाच एक भाग म्हणून फ्लॅश मॉबची संकल्पना राबविण्यात आली, ज्यामधील गीतनृत्यांना उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात कौतुकाची दाद दिली.

वाशीमधील इनॉर्बिट मॉलमध्ये व सीवूडमधील ग्रँड सेंट्रल मॉलमध्ये कोणतीही पूर्वकल्पना नसताना अचानक घडविलेल्या फ्लॅश मॉब या अभिनव उपक्रमामुळे स्वच्छतेचा संदेश नागरिकांपर्यंत अनोख्या पद्धतीने पोहचविण्यात आला, ज्याला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

# सोनखार स्पोर्ट्स फेस्टिव्हलची सांगता

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत व युवा नेते निशांत भगत यांच्या वतीने सोनखार स्पोर्ट्स अॅण्ड कल्चरल असोसिएशन आयोजित सोनखार स्पोर्ट्स फेस्टिव्हलचा समारोप झाला. या वेळी पारितोषिक वितरण समारंभ विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण सानपाडा सेक्टर १६ येथील गुनीना मैदानात झाले.




सानपाडा प्रभाग क्र. ७७ व ७८ मधील सेक्टर १, १३ ते १९ मधील नागरिकांकरिता सर्व वयोगटांतील विद्यार्थी व क्रीडाप्रेमींना भाग घेता यावा म्हणून डिसेंबर महिन्यात प्रतिवर्षी सोनखार स्पोर्ट्स फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात येते. यंदादेखील योगा व जिमनॅस्टिक, हॉलीबॉल, फुटबॉल, क्रिकेट, मिनी मॅरेथॉन, स्केटिंग, सायकलिंग, कराओके (गायन), बॅडमिंटन, कॅरम, बुद्धिबळ, नेमबाजी या क्रीडा प्रकारातील स्पर्धांसह ८ ते १५ वर्षे वयोगटातील मुलांसाठी विशेषतः जयपुरीयर स्कूल येथील मैदानात मिलीटरी ऍक्टिव्हिटीज सराव म्हणून ठेवण्यात आल्या होता. तसेच स्थानिक नगरसेविका वैजयंती भगत यांनी विभागातील महिला भगिनींना देखील स्वसंरक्षणासाठी निर्भर बनो या ट्रेनिंगपर कार्यक्रमाचे आयोजन २४ डिसेंबर रोजी करण्यात आले होते.

फेस्टिवलमध्ये आयोजित सर्व क्रीडा प्रकारांमध्ये सानपाडा पामबीच मधील सर्व सोसायट्यांमधील लहानांपासून जेष्ठ नागरिकांपर्यंत अश्या सगळ्यांनीच उस्फुर्तपणे सहभाग नोंदविला. यास्पर्धा प्रकारांमधील विजेत्यांना पारितोषिके देऊन मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

पारितोषिक वितरण सोहळयाला नगरसेविका फशीबाई करसन भगत, वैजयंती दशरथ भगत, रुपाली निशांत भगत यांसह प्रभागातील नागरिकांसह पामबीच-सोनखार जेष्ठ नागरिक सेवा समितीचे सर्व सदस्य, नाखवा सिताराम भगत सांस्कृतिक उत्सव मंडळाचे पदाधिकारी, इच्छापूर्ती स्पोर्ट्स क्लबचे सदस्य, सर्व क्रीडा प्रकारांचे समन्वयक, सर्व सोसायटीतील अध्यक्ष, सचिव, खजिनदार व पदाधिकारी त्याचप्रमाणे उपस्थित खेळाडू आणि महिला पुरुष, तरुण-तरुणी यांच्या उपस्थितीत ख्रिसमस व नवीन वर्षाचे स्वागत बच्चेकंपनीनी केक कापुन केले व सोनखार स्पोर्ट्स फेस्टीवलचा समारोप करण्यात आला. या पुरस्कार वितरण सोहळ्याचे सूत्रसंचालन शैलेश घाग यांनी केले.

# नवी मुंबईत आज पाणीपुरवठा बंद

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेमार्फत बुधवारी (दि. २८) मोरबे धरण ते दिघा मुख्य जलवाहिनीवर देखभाल दुरुस्तीची व इतर कामे करण्यात येणार आहेत. त्यामुळे बुधवारी सकाळी ८ ते सायंकाळी ८ या वेळेत हे काम करण्यात येत असल्याने बुधवारी शहरात होणारा पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील बेलापूर, नेरूळ, वाशी, तुर्भे, सानपाडा, कोपरखैरणे, घणसोली व ऐरोली व दिघा या विभागात बुधवारी सायंकाळी पाणीपुरवठा होणार नसून गुरुवारी सकाळी शहरात कमी दाबाने पाणीपुरवठा करण्यात येणार असल्याची माहिती पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने दिली आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांनी या कालावधीत पाण्याचा जपून वापर करण्याचे आवाहन शहर अभियंता संजय देसाई यांनी केले आहे.

# अमली पदार्थ तस्करीला आळा घालणार -भारंबे

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्याबरोबरच महिला, ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांसंदर्भातील गुन्हे, सायबर तसेच अमली पदार्थ तस्करीला आळा घालण्यासाठी प्राधान्य देणार असल्याचे मत नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी एका मुलाखतीमध्ये व्यक्त केले आहे. त्याशिवाय पोलीस आणि नागरिक यांच्यातील समन्वय वाढीवर भर देण्याचे त्यांनी संकेत दिले.



२१ व्या शतकातील शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवी मुंबई शहरात अलीकडच्या काळात गुन्हेगारीत वाढ झाली आहे. अशातच नवी मुंबई पोलीस दलाच्या आयुक्तपदी मिलिंद भारंबे रूजू झाले आहेत. १९९८च्या आयपीएस बॅचचे अधिकारी असलेले मिलिंद भारंबे यांनी आपल्या अडीच दशकाच्या कारकिर्दीत मिळालेली प्रत्येक जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडलेली आहे. अत्यंत मितभाषी असलेले भारंबे यांना पोलिस दलातील कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या विविध समस्या सोडवण्याचा दीर्घ अनुभव आहे. त्यामुळे नवी मुंबई पोलीस दलाला त्यांच्या अनुभवाचा निश्चितच फायदा होईल, अशी अपेक्षा आहे.

कोरोनामुळे लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीत काहीकाळ गुन्हेगारी कारवाया कमी झाल्या होत्या, मात्र तो अपवाद वगळता शहरात पुन्हा 'जैसे थे' परिस्थिती निर्माण झाली आहे. शहरातील हत्या, बलात्कार विनयभंग, चोरी घरफोडी, वाहनचोरी त्याचप्रमाणे सायबर गुन्हे, आर्थिक फसवणूक, अंमली पदार्थाची वाढती तस्करी, वेगवेगळ्या प्रकराचे बेकायदे धंदे वाढले आहेत. पण नवी मुंबई शहराला सुरक्षित व शांत ठेवण्यासाठी अधिक प्राधान्य देणार आहे.

अमली पदार्थासंबंधीचे कायदे खूप आव्हानात्मक आहेत. कुणीतरी सांगितले म्हणून कुणालाही पकडता येत नाही. त्यांच्याजवळ अमली पदार्थ सापडणे आवश्यक आहे, तरच त्याच्याविरोधात कारवाई करता येते. त्यामुळे बहुतेक गुह्यात मोठे पुरवठादार हाती लागत नाहीत. जोपर्यंत काही पुरावे सापडत नाहीत, तोपर्यंत त्याला पकडू शकत नाही. नवी मुंबई शहरातील अमली पदार्थ पुरवठा करणाऱ्या तस्करांची साखळी खंडीत केली तरच अमली पदार्थांचा पुरवठा करणारे मोठे तस्कर हाती लागतील.

नवी मुंबई शहरातील वाहतुकीचा व पार्किंगचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत चालला आहे. त्याचप्रमाणे शहरातील वाढते अवैध धंदे, सायबर गुह्यांचे व अमली पदार्थाच्या तस्करीचे वाढते प्रमाण पाहता या गुह्यांना आळा घालण्याचे मोठे आव्हान आहे. तसेच आगामी काळात होणाऱ्या नवी मुंबई महापालिका निवडणुकांमध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्याची मोठी जबाबदारी आहे, असेही मत मिलिंद भारंबे यांनी व्यक्त केले.

### सायबर गुन्ह्यांचे मुख्य आव्हान

***सायबर गुन्हे उघडकीस आणणे मोठे आव्हान असून सायबर गुन्हेगारांची राजस्थान, हरियाना, बिहार, झारखंड, यूपी, ओरिसा या राज्यात गावेच्या गावे आहेत. यातील अनेक गावे ही दुर्गम भागात आहेत. त्या भागात जाऊन सायबर गुन्हेगारांना पकडणे मोठे आव्हानात्मक काम आहे. त्यामुळे सायबर क्राईम खूप महत्त्वाचा विषय असून या गुह्यांचा तपास करण्याबरोबरच अशा प्रकारचे गुन्हे घडू नयेत, यासाठी लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती करणार आहे.***

# पीजेबी स्कूलमध्ये नाताळ, वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रतिक जयंत भोईर मेमोरियल फाउंडेशनच्या पीजेबी नॅशनल पब्लिक स्कूल, पळस्पे इथे नाताळ व वार्षिक स्नेहसंमेलनचा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

या वेळी चेअरमन जयंत भोईर, प्रार्थना भोईर, व्हॉईस चेअरमन व सरपंच चंद्रकांत भोईर, ट्रस्टी संजय पाटील, कमलेश अगरवाल, अर्चना अगरवाल, बाळकृष्ण भोईर व स्कूल प्रिन्सिपल राजेश्री जगदाळे, स्कूल स्टाफ व पालकवर्ग उपस्थित होते.

सर्व मुलांनी या कार्यक्रमात पूर्णपणे सहभागी होऊन हे स्नेहसंमेलनला यशस्वी केले व आनंद घेतला. असाच कार्यक्रम प्रत्येक सणाला साजरा करावा, अशी मागणी या वेळी पालकांनी केली.

# उरण महाविद्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन कार्यक्रम

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयात वाणिज्य व आजीवन शिक्षण व विस्तार विभागातर्फे राष्ट्रीय ग्राहक दिन प्राचार्य डॉ. बळीराम गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला.

या दिनाच्या निमित्ताने प्रा. एच. के. जगताप यांनी ग्राहक व ग्राहकाचे हक्का संबंधी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. तसेच ग्राहकाला तक्रार करण्यासाठी कोणती पद्धत वापरली जाते याबद्दलचे विश्लेषण करण्यात आले. नियती पानसरे व विनिता म्हात्रे या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय ग्राहक दिनाचे महत्त्व व वैशिष्ट्ये स्पष्ट करण्यात आले.

या कार्यक्रमात वाणिज्य व आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे प्रमुख प्रा. व्ही. एस. इंदुलकर यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. त्यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उद्देश स्पष्ट करण्यात आले. ग्राहक जागृतीच्या विषयासंबंधी विविध व्हिडिओ क्लिप विद्यार्थ्यांना दाखवण्यात आल्या. कार्यक्रमात उपस्थितांचे आभार प्रा. आर. टी. ठवरे यांनी मानले.

# पनवेलमध्ये आज स्वरगंगा मैफिल

## लिमये वाचनालयाच्या वर्धापन दिनाचे औचित्य

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील के. गो. लिमये वाचनालय व ग्रंथालयाच्या अमृत महोत्सवी (७५ वर्षे) वर्धापनदिन सोहळ्यानिमित्त बुधवारी (दि. २८) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील ज्येष्ठ नागरिक संघ सभागृहामध्ये होणाऱ्या या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, उद्योजक जे. एम. म्हात्रे व कोकण भवन येथील ग्रंथालय संचलनालयाच्या सहाय्यक संचालक शालिनी इंगोले यांची लाभणार आहे.

प्लॅटफॉर्म एन्टरटेन्मेट आणि इंद्रधनु थिएटर्स प्रस्तुत स्वरगंगा हा मराठी व हिंदी गीतांची सदाबहार मैफिल सायंकाळी ५ वाजता आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन के. गो. लिमये वाचनालय व ग्रंथालयाच्या अध्यक्ष अॅड. सुनिता जोशी, उपाध्यक्ष शाम वालावलकर, कोषाध्यक्ष विनायक वत्सराज, सचिव काशिनाथ जाधव तसेच सर्व कार्यकारी मंडळ व कर्मचारी वृंदांनी केले आहे.

# दिवाळे मार्केटमध्ये आधुनिक फिश फीड प्रकल्प

**नवी मुंबई : बातमीदार**

'फिश फीड' हा एक अभिनव उपक्रम दिवाळेगाव मार्केट येथे प्रायोगिक स्वरूपात राबविला जात आहे. विविध प्रकारच्या कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावली जात असताना मासळी मार्केट मधील कचरा हादेखील एक वेगळा व महत्वाचा भाग असून मासळी मार्केटमधील कचऱ्यावर अत्याधुनिक पध्दतीने प्रक्रिया करुन त्यापासून मत्स्य खादय तयार करण्याचा अत्यंत आधुनिक असा फिश फीड प्रकल्प दिवाळेगाव येथील मासळी मार्केटमध्ये प्रायोगिक स्वरुपात राबविला जात आहे.



'फिश फीड' हा मासळी मार्केटमधील कचरा विल्हेवाटीचा नवी मुंबई महापालिकेच्या पुढाकारातून कार्यान्वित प्रकल्प हा स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत राबविला जाणारा देशातील पहिलाच प्रकल्प आहे. यामुळे नवी मुंबई पालिका आणखी एका नाविन्यपूर्ण उपक्रमाचा आरंभ करण्यामध्ये देशात अग्रणी ठरली आहे.

फिशवर्कर्स वेल्फेअर फेडरेशन ऑफ इंडिया या भारत सरकार मान्यताप्राप्त संस्थेचा वतीने एक टन क्षमतेचा हा फिश फीड प्रकल्प दिवाळेगाव मासळी मार्केटमध्ये प्रायोगिक स्वरुपात कार्यान्वित करण्यात आला आहे व याविषयीचा सामंजस्य करार महानगरपालिका आणि संस्थेमध्ये झालेला आहे.

२०० किलो मासळीच्या कचऱ्याची एक बॅच अशा दिवसभरात पाच बॅचेस ही या प्रकल्पाची क्षमता असून या प्रक्रियेमध्ये मार्केटमध्ये निर्माण होणारा मासळीचा कचरा एकत्रित करून यंत्रसामुग्रीच्या सहाय्याने अत्यंत बारीक केला जाणार आहे व त्यानंतर त्याचे द्राव्य स्वरुपातील मत्स्य खादय म्हणून रुपांतर करण्यात येणार आहे. या कार्यवाहीकरिता मासळी मार्केटमधील मासळी विक्रेत्या महिलांचे विशेष सहकार्य लाभणार असून तेथील महिला बचत गटांमधील दोन महिलांना याठिकाणी रोजगारही उपलब्ध होणार आहे. या माध्यमातून त्यांचेही सक्षमीकरण होणार आहे.

### वाहतूक खर्चात बचत

***प्रकल्पाचा संपूर्ण खर्च फिशवर्कर्स वेल्फेअर फेडरेशन ऑफ इंडिया संस्थेमार्फत केला जात असून महापालिकेचा यामध्ये कोणताही निधी खर्च होत नाही. या प्रकल्पामुळे मासळी मार्केटमधून घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प स्थळापर्यंत वाहून न्यावा लागणारा कचरा निर्मितीच्या ठिकाणीच प्रक्रिया होणार असल्याने तो वाहून न्यावा लागणार नाही व त्यामुळे कचरा संकलन व वाहतूक खर्चात बचत होणार आहे.***

# उरणमध्ये वधू-वर मेळाव्यास प्रतिसाद



**उरण : बातमीदार, वार्ताहर**

श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक विकास व सेवा केंद्र (दिंडोरी प्रणित) अंतर्गत चाणजे, करंजा व मोरा केंद्र-उरण यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २५) कै. नानासाहेब धर्माधिकारी, नगरपरिषद शाळा, उरण येथे सर्व जाती धर्मीय वधू-वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमासाठी रायगड भूषण पुरस्कार प्राप्त विशाल पाटेकर व त्यांच्या सुविद्य पत्नी सायली पाटेकर, सामाजिक कार्यकर्ते गोपाळ पाटील व उरण सामाजिक सांस्कृतिक व शैक्षणिक संस्थेच्या अध्यक्षा कल्याणी दुखंडे हे उपस्थित होते. मुंबई विवाह संस्कार प्रतिनिधी वंदना करंदीकर व त्यांची टीम यांनी कार्य केले. नाव नोंदणी करून, वधू आणि वरांचा परिचय करून देण्यात आला. विवाह लवकर होण्यासाठी आध्यात्मिक सेवा देण्यात आल्या.

या मेळाव्यात १०० ते १५० फार्म भरून दोन स्थळांची बोलणी झाली. सर्व सेवा विनामूल्य देण्यात आल्या. उरण मध्ये प्रथमच अशा प्रकारे वधू-वर परिचय मेळावा झाला. या कार्यक्रमासाठी संजय साळुंके, संगिता साळुंके, प्रवीण पाटील, वनिता कोळी, मनिषा साळी व स्वाती पवित्रा ताई कोळी आणि सर्व जबाबदार सेवेकरी यांनी प्रचार प्रसार करण्यासाठी मोलाचे कार्य केले.

# अंबा नदी होतेय दूषित

## प्लास्टिक पिशव्यांसह निर्माल्याचा खच

**पाली : प्रतिनिधी**

अंबा नदी सुधागडवासियांबरोबरच पालीकरांची जीवनदायिनी म्हणून ओळखली जाते. संपूर्ण पालीसह बाजूच्या गावांना अंबा नदीतून पाणी पुरवठा होतो, मात्र सध्या या नदीला प्लास्टिकच्या पिशवीतून टाकलेल्या निर्माल्याच्या कचऱ्याने घेरले आहे. त्यामुळे नदीचे पाणी दूषित होत आहे.



घरात देवपुजेसाठी वापरलेली फुले, हार दुसऱ्या दिवशी शिळे होतात. हे निर्माल्य कुठेही टाकून दले जात नाही, तर ते पाण्यात विसर्जित केले जाते. पालीमध्ये तलाव कमी आहेत, तसेच त्यांचे पाणी खराब आहे. त्यामुळे अनेक जण निर्माल्य प्लास्टिकच्या पिशव्यांमधून थेट अंबा नदीत टाकून देतात. मार्गशीर्ष महिन्याच्या शेवटच्या गुरुवारी (दि. २२) तर नदीत प्लास्टिकच्या पिशवीतून टाकलेल्या निर्माल्याचा खच पडला होता. प्लास्टिकच्या पिशवीत हे निर्माल्य नदी पात्रात तसेच पडून राहते व कुजते आणि पाणी दूषित होते. प्लास्टिकच्या पिशव्या तसेच राहिल्याने त्यामुळेही प्रदूषण वाढते.

पावसाळ्यात वाहत्या पाण्याला या पिशव्यांचा अडथळा निर्माण होऊन पूरसदृश्य स्थिती निर्माण होते. शिवाय मासे व जीवसृष्टी देखील धोक्यात येते. मासेमारी करणाऱ्यांना पुरेसे मासेसुद्धा मिळत नाहीत. आजूबाजूच्या काही कंपन्यांमधूनही अंबा नदीमध्ये दूषित पाणी सोडले जाते. प्रदूषणामुळे पाण्याला उग्र स्वरूपाची दुर्गंध येते. चवही खराब लागते. समग्र पालीकर पिण्यासाठी व घरगुती वापरासाठी अंबा नदीच्या पाण्याचा वापर करतात. हे पाणी प्रदूषित झाल्याने नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

**प्लास्टिक पिशव्यांमधून निर्माल्य पाण्यात टाकल्याने ते तसेच पडून राहते, लवकर डी कंपोस्ट होत नाही. नागरिकांनी निर्माल्य कलशात टाकावे किंवा आपल्या परिसरातील चांगल्या मातीमध्ये खड्डा करून पुरावे व त्यातून खतनिर्मिती करावी. यामुळे पर्यावरणाचे संवर्धनदेखील होईल. याशिवाय बल्लाळेश्वर देवस्थानतर्फे निर्माल्यापासून खत निर्मिती केली जाते. तेथेही निर्माल्य देऊ शकतात.**

**–कपिल पाटील,**
**सामाजिक कार्यकर्ते, पाली**

## जागरूक नागरिक म्हणून दक्षता घेऊया!

### खोपोली पोलीस ठाणे व सहज सेवा फाउंडेशनचा उपक्रम



**खालापूर : प्रतिनिधी**

सहजसेवा फाउंडेशनने खोपोली पोलिसांच्या मार्गदर्शनाखाली गृहनिर्माण सोसायटीमधील नागरिकांनी बाहेरगावी जात असताना घ्यावयाची काळजी यासाठी शहरातील सोसायटीमध्ये काही सूचनांचे फलक लावण्याच्या उपक्रमाचा शुभारंभ सोमवारी (दि. २६) खोपोली पोलीस स्टेशन येथे झाला.

खोपोली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांनी शहरातील सोसायटी पदाधिकाऱ्यांना सुरक्षेविषयक सूचना देत मार्गदर्शन केले. या उपक्रमासाठी सहज सेवेच्या सामजिक कार्यात नेहमीच मोलाचे सहकार्य करणारे अगरवाल प्रिंटर्स, शिळफाटा यांचे बहुमोल सहकार्य लाभले. उपक्रम यशस्वी करण्यासाठी सहज सेवा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. शेखर जांभळे, कार्याध्यक्षा माधुरी गुजराथी, उपाध्यक्षा इशिका शेलार, खजिनदार संतोष गायकर, संघटक निलम पाटील, जनसंपर्क प्रमूख जयश्री कुलकर्णी, मार्गदर्शक मोहन केदार, राजेंद्र अगरवाल, नरेंद्र हर्डीकर, संजय करंजकर, सचिन गवळी, दिपाली जोशी तसेच उपक्रम प्रमुख तुषार अगरवाल यांनी अथक परिश्रम घेतले.

## सुरगडावर स्वच्छता मोहीम

### नवतरुण मित्र मंडळाची कामगिरी



**नागोठणे : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या गड–किल्ल्यांचे संवर्धन केले पाहिजे हे उद्दिष्ट डोळ्यसमोर ठेऊन वाघळी येथील नवतरुण मित्र मंडळानी रविवारी (दि. २५) रोहा तालुक्यातील किल्ले सुरगड येथे स्वच्छता मोहीम राबविली.

किल्ल्यावरील वाड्यांच्या जोत्यावरील गवत साफ करून त्यांनी मोकळा श्वास घेतला. या मोहिमेत महेश किर्दत, सुजय साळुंखे, राहुल कदम, रुपेश कदम, निलेश किर्दत, रोशन कदम, निकिता कदम, चैताली कदम इत्यादी तरुणांनी सहभाग घेतला होता. छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपला कारभार गडकिल्ल्यांवरून केला. अशा या ऐतिहासिक गडकिल्ल्यांचे संवर्धन होणे काळाची गरज असल्याचे विचार या वेळी महेश किर्दत यांनी व्यक्त केले.

## रोह्यात वाढत्या चोऱ्यांप्रकरणी उपाययोजना करण्याची मागणी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यामध्ये गेल्या काही दिवसांपासून चोरीचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे नागरिकांच्या मनात चिंतेचे वातावरणात पसरले आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाने सीसीटीव्हीसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जनजागृती मोहीम राबविण्यात यावी, अशी मागणी करणारे निवेदन सोमवारी (दि. २६) सुराज्य सामाजिक प्रतिष्ठानतर्फे रोहा पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांना निवेदन देण्यात आले.

या वेळी सुराज्यचे अध्यक्ष रोशन चाफेकर, सदस्य मयुर धनावडे, कुणाल आंबले, शुभम मोहिते, शुभम जंगम, दिपक महाजन, क्षितिज गोविलकर, आदित्य गुळवणी उपस्थित होते.



## सुषमा अंधारेंविरोधात श्रीवर्धनमध्ये निषेध रॅली

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी हिंदू देवतांबद्दल तसेच संतांबद्दल केलेल्या अपमानास्पद वक्तव्याविरोधात त्यांचा हिंदू एकता मंचातर्फे श्रीवर्धनमध्ये निषेध रॅली काढण्यात आली. त्यानंतर त्यांच्याविरूद्ध योग्य कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करणारे निवेदनही पोलीस ठाण्यात देण्यात आले.

या निषेध रॅलीमध्ये मोठ्या संख्येने वारकरी हातामध्ये टाळ, चिपळ्या, भगव्या पताका, मृंदुग घेऊन ज्ञानोबा, तुकाराम यांचे अभंग गात सहभागी झाले होते. त्याचप्रमाणे हिंदू एकता मंच, हिंदुत्ववादी संघटनांनीही सहभाग घेतला होता. शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी जाहीर भाषणातून सतत हिंदू देवता व संतपुरूषांबाबत अपमानास्पद शब्द उच्चारले आहेत. त्यांचे हे वक्तव्य हिंदूधर्मिय व वारकरी संप्रदायाच्या धार्मिक भावना दुखावणारे असे असून त्यांच्यावर योग्य ती कारवाई व्हावी, यासाठी श्रीवर्धन पोलीस निरीक्षक संजय पाटील यांना निवेदन देण्यात आले.




या वेळी सावन तवसाळकर, पिंट्या वेश्वीकर, संतोष चौकर, प्रशांत शिंदे, देवेंद्र भुसाणे, रामचंद्र महाराज वाघे, हरिबुवा वाघे, महादेव रघुवीर आदी उपस्थित होते.

## ईमेज कॅलेंडरमधून छायाचित्रांद्वारे पर्यटनस्थळांची ओळख

**अलिबाग : प्रतिनिधी**

ईमेज कॅलेंडरच्या माध्यमातून छायाचित्रांद्वारे आपल्या रायगड जिल्ह्यातील निसर्गाची माहिती लोकांपर्यंत पोहचत आहे. ईमेज कॅलेंडरमधून नव्या पर्यटनस्थळांची ओळख होत आहे. लहान मुलांनी काढलेले फोटो या कॅलेंडरमध्ये प्रसिद्ध करून त्यांनादेखील संधी देण्याचा प्रयत्न करावा, असे प्रतिपादन रायगडचे अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी केले.



इमेज कॅलेंडर २०२३ प्रकाशन सोहळा आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी अतुल झेंडे बोलत होते. ईमेज कॅलेंडरतर्फे आयोजित करण्यात आलेल्या छायाचित्र स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांचे पारितोषिक वितरण करण्यात आले. या वेळी व्यासपीठावर रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिप नाईक, आदर्श पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, आदर्श पतसंस्थेचे विद्यमान अध्यक्ष अभिजीत पाटील, इमेज कॅलेंडरचे रमेश कांबळे, जितेंद्र शिगवण, समीर मालोदे आदी उपस्थित होते.

ईमेज कॅलेंडरच्या छायाचित्र स्पर्धेसाठी आलेल्या सर्व छायाचित्रांचे प्रदर्शन लायन्स क्लबच्या अलिबाग येथील फेस्टीवलमध्ये भरवता येईल. यातून सर्वांनाचा व्यासपिठ मिळेल. हे कॅलेंडर लोकांपर्यंत पोहचविता येईल. या कॅलेंडरचा पर्यटन वाढीसाठी नक्कीच हातभार लागेल, असे प्रदिप नाईक यांनी सांगितले. रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, आदर्श पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित पाटील, संस्थापक सुरेश पाटील यांचीही या वेळी भाषणे झाली.

समीर मालोदे यांनी प्रास्ताविक व आभारप्रदर्शन केले. सुयोग आंग्रे यांनी सूत्रसंचालन केले.

## कोलीवलीत सटूआई देवीच्या यात्रेचा उत्साह



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील नेरळजवळ असलेली सटूआई देवीची यात्रा मोठ्या उत्साहात झाली. यात्रेत रायगड आणि ठाणे जिल्ह्यातील हजारो भाविक नवस फेडण्यासाठी आले होते. कोलीवली येथील सटूआई देवीच्या मंदिरात पौष महिन्याचे पहिल्या दिवशी यात्रा असते.

देवीच्या यात्रेच्या निमित्ताने नेरळ–कशेळे रस्ता वाहनांनी फुलून गेला होता. ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील भाविकांनी देवीच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. दुसरीकडे वाहनांच्या गर्दीमुळे नेरळ पोलिसांनी रस्त्यावर कोणालाही आपल्या गाड्या उभ्या करू दिल्या नाहीत. त्यामुळे भाविकांची वाहतूक कोंडीतून सुटका झाली.

### पौर्णिमेपर्यंत भक्तांची गर्दी

**यात्रा पौष पौर्णिमेपर्यंत सुरू असते. या १५ दिवसांचे काळात यात्रेत भक्त देवीच्या मंदिरात येत असतात आणि नंतर सोबत आणलेले अन्न शिजवून पुन्हा घरी परतत असतात. त्यामुळे मंगळवार, बुधवार, शुक्रवार आणि रविवार या दिवशीदेखील शेकडो भक्त देवीच्या दर्शनासाठी आलेले दिसून येतात.**



## ग्राहक दिनानिमित्त जिल्हा पुरवठा विभागातर्फे पथनाट्यातून जनजागृती

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त जिल्हा पुरवठा विभाग जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड–अलिबाग यांच्या वतीने जागो ग्राहक, जागो या पथनाट्यातून ग्राहकांचे अधिकार व ग्राहक संरक्षण अधिनियम–२०१९ याविषयी जनजागृती करण्यात आली.

या वेळी या कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रभारी सहाय्यक ज्ञानदेव यादव, नायब तहसीलदार मानसी पाटील, राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तथा प्रिझम सामाजिक विकास संस्थेच्या अध्यक्षा तपस्वी नंदकुमार गोंधळी, अव्वल कारकून विनायक सर्णेकर, नयन नाईक, हेमंत पाटील, दीपक मुळे, दिलीप शहापूरकर, महसूल सहाय्यक प्रेरणा पाटील, अनेश पाटील, गणेश पाटील, विजय नाईक आदी उपस्थित होते.

या पथनाट्यातून प्रिझम सामाजिक विकास संस्थेच्या कलाकारांनी अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर व अलिबाग बसस्थानक येथे जनजागृती केली. पथनाट्यात प्रतिक कोळी, विराज म्हात्रे, साक्षी पाटील, नेहा म्हात्रे, सार्थक गायकवाड, वैष्णवी नागे आदी कलाकार सहभागी झाले होते.

## खोपोलीत बाराखडी मंचची स्थापना

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिका विभागातील निर्माण झालेल्या विविध नागरी समस्यांवर खोपोलीतील मान्यवर एकत्र येऊन पर्यायी मार्ग काढण्यासाठी विवीध सामाजिक, राजकिय, शैक्षणिक संस्था यातील पदाधिकारी यांनी एकत्र येत खोपोली बाराखडी नावाची संस्था स्थापन केलेली आहे.

खोपोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी अनुप दुरे यांच्या दालनात सोमवारी (दि. २६) खोपोली बाराखडीचे पदाधिकारी यांच्यात पाणी, रस्ते, आरोग्य, वीज व काही तांत्रिक बाबी संदर्भात विस्तृत चर्चा झाली. शहरांतील विविध समस्यांवर नागरिकांच्या तक्रारी जाणून घेऊन सहकार्य करण्याची भूमिका मुख्याधिकारी यांनी विषद केली. या वेळी खोपोली बाराखडीचे अध्यक्ष दिनकर भुजबळ, कार्याध्यक्ष आशपाक लोगडे, उपाध्यक्ष नरेंद्र हर्डीकर, सचिव डॉ. शेखर जांभळे, खजिनदार प्रवीण जाधव, संघटक संजय करंजकर, महिला संघटक सुरेखा खेडकर, संपर्क प्रमुख मोहन केदार, सहसचिव निखिल गुरव, सहखजिनदार सतीश येरूनकर, सह संपर्क प्रमुख उबेद पटेल, कायदेशीर सल्लागार ॲड. जयेश तावडे यांचे अभिनंदन करून सर्वोत्परी सहकार्य करण्याचे आश्वासन मुख्याधिकारी अनुप दूरे यांनी दिले आहे.



## नागोठण्यात नेत्र तपासणी शिबिर



**नागोठणे : प्रतिनिधी**

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, नागोठणे मण्युफकचरींग डीव्हिजन सी. एस. आर. विभाग व लायन्स हेल्थ फाउंडेशन, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि. २३) कुहिरे व वरवठणे येथील ४५ वर्षावरील नागरिकांसाठी नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

कुहिरे ग्रामपंचायत येथील नेत्र तपासणी शिबिराचे उद्घाटन रिलायन्स इंडस्ट्रीजचे आय. आर. विभाग प्रमुख श्रीकांत गोडबोले, जनसंपर्क अधिकारी रमेश धनावडे व सीएसआर अधिकारी वरदा कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत व कुहीरे सरपंच प्रज्ञा जवके, नागोठणे पोलीस निरीक्षक राजन जगताप, उदय जवके तसेच लायन्स हेल्थ फाउंडेशन, अलिबाग मुख्यकार्यकारी अधिकारी शुभदा कुडतरकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

या वेळी सहाय्यक फौजदार दयानंद ठाकूर, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक प्रमोद कदम यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. वरवठणे ग्रामपंचायत येथील नेत्र तपासणी शिबिराचे उद्घाटन श्रीकांत गोडबोले, रमेश धनावडे, वरदा कुलकर्णी व शुभदा कुडतरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सरपंच ऋतुजा म्हात्रे, उपसरपंच विजय पाटील, ग्रा. पं. सदस्य गणपत म्हात्रे, हरिश्चंद्र म्हात्रे, रिलायन्स वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत बारडोलइ व त्यांचे सहकारी डॉ. किरण सातवे यांच्या हस्ते झाले.

या नेत्र तपासणी शिबिरात कुहीरे येथे ७१ रुग्ण तपासणी करून एकूण २६ रुग्णांना मोतीबिंदू निदान करण्यात आले, तर वरवठणे येथे ४७ रुग्ण तपासणी करून एकुण १४ रूग्णांना मोतीबिंदू निदान करण्यात आले असून मोतीबिंदू रुग्णांचे अलिबाग येथे शस्त्रक्रिया मोफत होणार असल्याची माहिती वरदा कुलकर्णी यांनी दिली.

# श्रीलंकेविरुद्धच्या मालिकेला रोहित, राहुल मुकणार?

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि श्रीलंका यांच्यात नवीन वर्षात जानेवारी २०२३च्या पहिल्या आठवड्यात तीन सामन्यांची टी-२० आणि तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका मालिका खेळली जाणार आहे. उभय संघांतील टी-२० मालिका ३ जानेवारी रोजी सुरू होणार असून यासाठी कर्णधार रोहित शर्मा आणि उपकर्णधार केएल राहुल उपस्थित नसतील, असे सांगितले जात आहे.

भारतीय कर्णधार रोहित शर्मा आणि फॉर्मात नसलेला सलामीवीर केएल राहुल जानेवारीत श्रीलंकेविरुद्धच्या घरच्या मालिकेला मुकणार आहेत. श्रीलंकेविरुद्धच्या मर्यादित षटकांच्या मालिकेत दोघेही न खेळण्यामागे वेगवेगळी कारणे आहेत. डिसेंबरमध्ये बांगलादेशविरुद्धच्या दुसर्‍या एकदिवसीय सामन्यात झालेल्या अंगठ्याच्या दुखापतीतून रोहित अद्याप पूर्णपणे बरा झालेला नाही, असे अहवालात म्हटले आहे.

बीसीसीआयमधील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार केएल राहुल श्रीलंकेविरुद्धच्या एकदिवसीय आणि टी-२० मालिकेदरम्यान लग्न करणार आहे. भारत आणि श्रीलंका यांच्यात ३ ते १५ जानेवारी या कालावधीत समान सामन्यांची तीन टी-२० आणि एकदिवसीय मालिका होणार आहे. विशेषत: रोहित आणि राहुलसाठी ही मालिका महत्त्वाची होती, ज्यांना २०२२मध्ये फलंदाजी चांगली करता आली नाही.

रोहित शर्माने सरत्या वर्षात काही वेळा त्याच्या ‘हिटमॅन’ टॅगनुसार संघर्ष केला आहे. या वर्षी दोन कसोटी सामन्यांमध्ये रोहितने ४६च्या सर्वोत्तम धावसंख्येसह ३०च्या सरासरीने एकूण ९० धावा केल्या. आठ एकदिवसीय सामन्यांमध्ये त्याने ४१.५०च्या सरासरीने २४९ धावा केल्या ज्यात तीन अर्धशतकांचा समावेश आहे. त्याच वेळी त्याने २९ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ६५६ धावा केल्या.



दुसरीकडे केएल राहुलने या वर्षी चार कसोटी सामने खेळले असून एका अर्धशतकासह त्याने १७.१२च्या सरासरीने १३७ धावा केल्या आहेत. या वर्षी १० एकदिवसीय सामन्यांमध्ये त्याने २७.८८च्या सरासरीने केवळ २५१ धावा केल्या, ज्यात दोन अर्धशतकांचा समावेश आहे. त्याच वेळी २०२२मध्ये १६ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये २८.९३च्या सरासरीने ४३४ धावा केल्या.

### वरिष्ठांच्या जागी युवा खेळाडूंना संधी मिळण्याची शक्यता

हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखाली होणार्‍या श्रीलंकेविरुद्धच्या या मालिकेत वरिष्ठ खेळाडूंना विश्रांती देऊन युवा खेळाडूंना संधी दिली जाण्याची शक्यता आहे. अशा स्थितीत मधल्या फळीत फलंदाजीसाठी ३१ वर्षीय फलंदाज राहुल त्रिपाठीचा संघात समावेश केला जाऊ शकतो.

राहुल त्रिपाठी अलीकडेच बांगलादेश दौर्‍यावर एकदिवसीय संघाचा भाग बनला होता, परंतु त्याला प्लेइंग ११मध्ये स्थान देण्यात आले नव्हते. राहुलने आयपीएल २०२२मध्ये १४ सामने खेळून ४१४ धावा केल्या होत्या. या चमकदार कामगिरीमुळे त्याला संघात स्थान देण्यात येत होते. सलामीशिवाय राहुल हा मधल्या फळीतही फलंदाजी करू शकतो.

सलामीवीर फलंदाज पृथ्वी शॉ यालादेखील संधी मिळण्याची शक्यता आहे. पृथ्वीने २०२१मध्ये भारतासाठी पहिला आणि शेवटचा टी-२० आंतरराष्ट्रीय सामना खेळला. आता पुन्हा एकदा त्याला भारताच्या टी-२० संघात स्थान मिळू शकते. पृथ्वीने आयपीएलमध्ये १४७.४५च्या स्ट्राईक रेटने धावा केल्या होत्या.

# मुंबई इंडियन्सला आयपीएलआधी धक्का

## १७.५ कोटींना घेतलेला कॅमेरून रुग्णालयात

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

मुंबई इंडियन्सच्या चाहत्यांसाठी एक मोठी बातमी समोर आली आहे. इंडियन प्रीमियर लीग २०२३च्या मिनी लिलावात चमकणारा आणि १७.५ कोटींच्या मोठ्या किमतीत मुंबई संघाने खरेदी केलेल्या कॅमेरूनला हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागले आहे. बॉक्सिंग डे कसोटीच्या दुसर्‍या दिवशी कॅमेरूनला दुखापत झाली.


सध्या मेलबर्नमध्ये बॉक्सिंग डे कसोटी सामने सुरू आहे. यामध्ये दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील सामन्यात कॅमेरून ग्रीन फलंदाजी करीत होता. एनरिक नॉर्खियाचा एका वेगवान चेंडू कॅमेरूनच्या ग्लोव्हजवर आदळला आणि तो वेदनेने कळवळला. त्याने हातमोजे काढले तेव्हा त्याच्या बोटातून रक्त येत होते. त्याला तत्काळ मैदानाबाहेर नेऊन स्कॅनसाठी पाठवले गेले.

ऑस्ट्रेलियन मीडियाने दिलेल्या माहितीनुसार कॅमेरून ग्रीनला मेलबर्न क्रिकेट ग्राउंडवरून थेट हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले, जेथे त्याचे दुखापत झालेले बोट स्कॅन केले जाईल.

### नोर्कियावर धडकला स्पायडर कॅमेरा

मेलबर्न कसोटीच्या दुसर्‍या दिवशी दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज एनरिक नॉर्खिया एका मोठ्या अपघातातून थोडक्यात बचावला. फिल्डिंग करीत असताना स्पायडर कॅमेर्‍याची टक्कर नोर्कियाशी झाली आणि तो तोंडावर पडला. काही वेळ सहकारी खेळाडूंना काय झाले ते समजू शकले नाही.

# ओवे संघाने होपमिरर चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

होपमिरर फाउंडेशनच्या वतीने खारघरच्या ओवे येथे सोमवारी (दि. २६) होपमिरर चॅम्पियन्स ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ओवे संघाने विजेतेपद पटकावून चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली.

स्पर्धेत कल्याण, कर्जत, शहापूर, भिवंडी या चार आदिवासी संघांसह एकूण १६ संघांचा समावेश होता. यामध्ये व्हीलचेअर क्रिकेटला पाठिंबा देण्यासाठी महाराष्ट्र वि. उर्वरित भारत या दोन संघांमध्ये चॅरीटी सामना खेळला गेला, तर तळोजा आणि खारघर पोलीस ठाणे असा प्रदर्शनीय सामनाही रंगला.

स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे तालुका उपाध्यक्ष सचिनशेठ पाटील यांच्या हस्ते झाले. स्पर्धेवेळी भाजपचे प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील तसेच गुरू म्हात्रे, दिलशाद खान, शबनम शेख, अक्रम शेख, अयुब शेख यांची उपस्थित होती.

मुरबी संघ उपविजेता ठरला. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. होपमिरर फाउंडेशनचे अध्यक्ष रमजान शेख यांनी विजेत्यांचे अभिनंदन करून सहभागी संघ तसेच स्पर्धेस सहकार्य करणार्‍या सर्वांचे आभार मानले.

### हिंदकेसरी कुस्ती स्पर्धेत खेळणार्‍या महाराष्ट्राच्या पैलवानांवर कारवाई होणार

**मुंबई :** हिंदकेसरी कुस्तीसाठी महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेच्या अस्थाई समितीने महाराष्ट्रातील मल्लांना इशारा दिला आहे. ‘हिंदकेसरी’ खेळणार्‍या पैलवान यांच्यावर कारवाई केली जाईल.

या संदर्भात कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष संजय कुमार सिंह यांनी पत्रात म्हटले आहे की, भारतीय शैली कुस्ती महासंघाने ५ ते ८ जानेवारीदरम्यान हैदराबादमधील तेलंगणा येथे अखिल भारतीय ५१वी हिंदकेसरी कुस्ती स्पर्धा आयोजित केली आहे. या स्पर्धेत महाराष्ट्रातील पैलवान खेळले तर परिषदेची अस्थाई समिती कारवाई करेल. दरम्यान, महाराष्ट्र कुस्ती स्पर्धा पुण्यात होणार आहे.

# कराटे स्पर्धेत मुरूड, अलिबागच्या विद्यार्थ्यांचे यश

**रेवदंडा : प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय शालेय कराटे स्पर्धा नुकतीच पनवेल तालुका क्रीडा संकुल येथे झाली. या स्पर्धेत विविध शाळांतील २००हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये मुरूड व अलिबाग तालुक्यातील विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळवले आहे.



स्पर्धेत निरनिराळ्या वयोगटांमध्ये अनुज रा. भोईर, ग्रीष्म सो. राऊळ प्रथम क्रमांक (दोघेही नज हायस्कूल), सानिया फुलारे (कोएससो वि. म. पिळणकर कनिष्ठ महाविद्यालय, रेवदंडा), आदित्य कांबळे (सुविध्या स्कूल) सर्व प्रथम क्रमांक; नहुष पवार (नचिकेतास हायस्कूल विहूर), नेहाल अ. घोले, पर्वणी न. चोरघे, पायल सुतार (तिघेही कोएससो वि. म. पिळणकर कनिष्ठ महाविद्यालय, रेवदंडा), आयुब इ. उल्डे (नज हायस्कूल) सर्व द्वितीय क्रमांक; पायल शि. राठोड व सूरज रा. कोहली (कोएससो वि. म. पिळणकर कनिष्ठ महाविद्यालय, रेवदंडा), श्रुष्टी कांबळे (कोएससो स. रा. ते. विद्यालय, रेवदंडा), सानिया पिळणकर (कोएससो वि. म. पिळणकर कनिष्ठ महाविद्यालय, रेवदंडा), तांजिला मुक्रिरे, परशुराम झावरे, भावार्थ पाटील, (कोएससो इंग्रजी माध्यम, रेवदंडा), तनिष ते. पाटील (कोएससो जनरल अरुणकुमार वैद्य माध्यमिक विद्यालय, अलिबाग), परी श. नाखवा (चिंतामणी केळकर विद्यालय, अलिबाग), वरद मोहिते (मेहबूब हायस्कूल विहूर), अर्षान दळवी, शुभम राठोड, भारत जैस्वाल (नज हायस्कूल) सर्व तृतीय क्रमांक यांनी यश प्राप्त केले.

या सर्व विद्यार्थ्यांना कराटे प्रशिक्षक सिहान नंदकुमार वरसोलकर, सेंसाय सनी रा. खेडेकर, अरविंद भोपी, ओंकार वरसोलकर, शिवम सिंह व क्रीडा शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविलेल्या विद्यार्थ्यांची विभागीय कराटे स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सर्व शाळांतील मुख्याध्यापक व स्टाफने यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# ट्वेन्टी-२०मध्ये अव्वलस्थान स्वप्नवत -सूर्या

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**




भारतीय क्रिकेटमधील आक्रमक फलंदाज अशी ओळख झालेल्या सूर्यकुमार यादवला ट्वेन्टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट क्रमवारीत अग्रमानांकित खेळाडू बनणे स्वप्नवत वाटते. तरीही मर्यादित षटकांच्या प्रारूपाव्यतिरिक्त कसोटी क्रिकेटमध्ये आपली छाप पाडण्यास सूर्यकुमार उत्सुक आहे.

आपल्या कामगिरीबाबत सूर्यकुमार म्हणाला की, क्रमवारीबाबत विचारल्यास मला सर्वकाही स्वप्नवत भासते आहे. वर्षभरापूर्वी मला कोणी ट्वेन्टी-२० क्रमवारीबाबत विचारले असता माझ्याकडे देण्यास उत्तर नव्हते. जेव्हा मी या प्रारूपात खेळण्यास सुरुवात केली तेव्हा सर्वोत्तम कामगिरी करायची होती. याकरिता मी कठोर मेहनतही केली. जेव्हा मी कोणत्याही प्रारूपात खेळतो तेव्हा मी त्या प्रारूपाबाबत फार विचार करत नाही. मी फलंदाजी करताना त्याचा पुरेपूर आनंद घेत असतो. मला फलंदाजी करण्यास आवडते मग ते ट्वेन्टी-२०, एकदिवसीय असो की रणजी करंडक स्पर्धा.

> **विराट कोहली आणि रोहित शर्मासारख्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील दिग्गज खेळाडूंसोबत मी खेळत आहे. ते ज्या स्तरावर आहेत तिथपर्यंत मी कधी पोहचेन हे मला माहीत नाही, परंतु अलीकडेच मी विराटसोबत काही भागीदार्‍या रचल्या आणि त्याच्यासोबत खेळण्याचा आनंद घेतला.**
>
> **-सूर्यकुमार यादव**

खेळाडूला उच्च स्तरावर खेळताना मानसिकदृष्ट्या कसे तयार असायला हवे, यावर सूर्यकुमारने सांगितले की, ही गोष्ट असंभव नाही, मात्र कठीण असते. यासाठी तुमचा दृष्टिकोन चांगला असणे गरजेचे आहे. मी अधिक सराव करण्यापेक्षा चांगला सराव करण्यावर भर देतो. भारतासाठी पदार्पण करण्यापूर्वी मी १० वर्षे प्रथम श्रेणी क्रिकेट खेळलो आहे. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये खूप गोष्टी शिकण्यास मिळतात. जेव्हा तुम्ही आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळता आणि वेगवेगळ्या गोलंदाजांचा सामना करता तेव्हा तुम्हाला स्वत: अभिव्यक्त होण्याची गरज असते.

आगामी काळात ऑस्ट्रेलियाचा संघ चार कसोटी सामन्यांसाठी मालिका खेळण्यासाठी भारतात येणार आहे, या दौर्‍याबाबत सूर्यकुमारने सांगितले की, मी लाल चेंडूने विविध वयोगटांच्या राष्ट्रीय स्तरावर खेळण्यास सुरुवात केली. पाच दिवसांच्या सामन्यात तुमच्यासमोर आव्हाने असतात आणि त्यामुळे परिस्थितीही रोमांचक होते. मला या मालिकेसाठी संधी मिळाल्यास मी तयार आहे.

### रबरी चेंडूने खूप क्रिकेट खेळलो!

सूर्यकुमार हा क्रिकेटच्या मैदानात सर्व ठिकाणी फटके मारण्यात चांगलाच लोकप्रिय आहे, यावर तो म्हणाला की, मी शालेय आणि महाविद्यालयीन दिवसांत रबराच्या चेंडूने खूप क्रिकेट खेळलो. सिमेंटच्या खेळपट्टीवर आणि पावसाच्या दिवसांत हा चेंडू जलदगतीने येत असे. त्यातच एका बाजूची सीमारेषा ही अधिक, तर दुसर्‍या बाजूची कमी असे. गोलंदाज ऑफ साइडची सीमारेषा कमी असल्याची बाब लक्षात ठेवून गोलंदाजी करायचे. यातूनच मी मनगटाचा वापर करणे, पुल करणे आणि अपर कट मारणे शिकलो. मी नेटमध्येही याचा सराव केला नाही.

# डेव्हिड वॉर्नरचे ऐतिहासिक द्विशतक

**मेलबर्न : वृत्तसंस्था**




ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील बॉक्सिंग डे कसोटीच्या दुसर्‍या दिवशी डेव्हिड वॉर्नरने शंभराव्या कसोटीत शतक ठोकले. त्याचा आनंद साजरा होत होता तोपर्यंत त्याने आपले हे ऐतिहासिक शतक द्विशतकात रूपांतरित केले. वॉर्नरने २५४ चेंडूंत १६ चौकार आणि दोन षटकार मारत २०० धावा ठोकल्या. ऑस्ट्रेलियाकडून १००व्या कसोटीत द्विशतक ठोकणारा तो इतिहासातील पहिला क्रिकेटपटू ठरला.

डेव्हिड वॉर्नरने आपल्या शंभराव्या कसोटीत शतकी मजल मारून ऐतिहासिक कामगिरी केली. झुंजार वॉर्नर इथेच थांबला नाही तर त्याने आपली ही ऐतिहासिक खेळी मोठी करण्याचा निर्धार केला. त्याने आक्रमक फलंदाजी करीत आधी दीडशतकी आणि नंतर द्विशतकी मजल मारली.

ऑस्ट्रेलियाकडून आपल्या १००व्या कसोटीत द्विशतक झळकावणारा डेव्हिड वॉर्नर हा एकमेव फलंदाज ठरला, तर १००व्या कसोटीत द्विशतक ठोकणारा जो रूट नंतरचा दुसराच फलंजाज ठरला. रूटने भारताविरूद्ध २०२१मध्ये आपल्या शंभराव्या कसोटीत द्विशतक झळकाविले होते.

ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावाच्या ७६व्या षटकात शेवटच्या चेंडूवर एन्गिडीला चौकार मारत डेव्हिड वॉर्नरने आपले द्विशतक पूर्ण केले. द्विशतक पूर्ण केल्यानंतर वॉर्नरने जोरदार सेलिब्रेशन करत आपली सिग्नेचर उंच उडी मारली, मात्र याचवेळी वॉर्नरला पुन्हा क्रॅम्प आला आणि तो खाली वाकला. जास्तच क्रॅम्प येऊ लागल्याने त्याने मैदान सोडले. वॉर्नर रिटायर्ड हर्ट झाला त्या वेळी त्याने २५४ चेंडूंत नाबाद २०० धावा ठोकल्या होत्या.



# अनसोल्ड राहिल्याने संदीप शर्मा नाराज

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या नव्या हंगामासाठी नुकताच मिनी लिलाव झाला. या लिलावात अनेक खेळाडू कोट्यवधी झाले. काही नवख्या भारतीय खेळाडूंनादेखील मोठी रक्कम मिळाली, मात्र या लिलावात काही अनुभवी खेळाडू फ्रँचायझींना आकर्षित करण्यात अपयशी ठरले. यातीलच एक नाव म्हणजे भारतीय संघाचा वेगवान गोलंदाज संदीप शर्मा. मला कोणतीच फ्रँचायझी खरेदी करत नाही हे पाहून निराश झालो असून हे धक्कादायक असल्याचे संदीपने म्हटले.

नाराज असलेल्या संदीप शर्माने क्रिकेट डॉट कॉमशी संवाद साधताना म्हटले, मला धक्का बसला असून मी नाराज आहे. मला खरेदी का केले नाही हे मला माहीत नाही. मी ज्या संघासाठी खेळलो त्या संघासाठी मी चांगली कामगिरी केली आहे आणि काही संघ माझ्यासाठी बोली लावतील असे मला वाटले होते. खरे सांगायचे तर मला याची अपेक्षा नव्हती. दरम्यान, लक्षणीय बाब म्हणजे तरीदेखील संदीप हा रिप्लेसमेंट खेळाडू म्हणून आयपीएलमध्ये खेळू शकतो.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com